
# महाभारत

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे



खंड ४४

शांतीपर्व

# महाभारत

## महाभारत खंड चव्वेचाळीसावा

## शांती पर्व भाग नववा

## मोक्ष धर्म पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत


## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**



©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



**प्रकाशन : १० सप्टेंबर २०२१**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत पंचेचाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा चव्वेचाळीसावा खंड, शांती पर्व भाग नववा, मोक्ष धर्म पर्व, आपण आता वाचणार अहात. ह्या खंडामध्ये शुद्ध अध्यात्म विद्या सांगितली आहे. ह्या आधीच्या शांती पर्वांतील खंडांतून नितीशास्त्र समजावून सांगितले आहे. हिंदू धर्माचे हे दोन भाग आहेत. त्यानंतर कर्मकांड येते परंतु, त्यावर महाभारतात विशेष चर्चा केलेली नाही. कर्मकांड आगम शास्त्रातून तयार झाली आहेत.
शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुपं कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू

समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत

त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. कर्मकांडासाठी आगम शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो ते महाभारतात नाही. अध्यात्मविद्येत माणसाने स्वतामधील परमेश्वर कसा पहावा, कसा त्याच्याशी संपर्क करावा त्याचे शिक्षण असते तो विषय शांतीपर्वात विशेषकरून सविस्तरपणे पाहिलेला आहे. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ असला तरी भक्तीमार्गी निश्चितच नाही, तो ज्ञानमार्गी आहे. असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

## - शांती पर्व भाग नववा –

## मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे एकावन्नावा

युधिष्ठीर विचारतात, "मला सांगा अहो पितामहा, शुक मुनीचा जन्म व्यासांचा मुलगा म्हणून कसा झाला? मला ते सुद्धा समजून घ्यावयाचे आहे कीं, तो शुक उच्चपदाला कसा गेला? कोणत्या महिलेवर कृपा झाली व्यासांची कीं, तिने शुकाला जन्म दिला? शुकाची आई कोण होती"? त्याच्या जन्माबद्दल कांहींच माहिती कोणालाही नाही. शुक लहान असतांनाच त्याला मोक्षाची ओढ लागली. इतक्या लहान वयात असें बैराग्य तो दाखवत होता जे सहसा शक्य नसते. मला ते सगळे समजून घ्यावयाचे आहे. ते सगळे क्रमवार मला सांगा. त्याला मोक्ष प्राप्ती कशी झाली ते सांगा.
भिष्म सांगतात, संपत्ती, जन्म कुळ, मित्रत्व किंवा आरोग्य पाहून माणसांची किंमत ऋषी करत नसतात. ते त्याचे वेदाचे ज्ञान पहातात. तू जे विचारत आहेस त्याच्या मागे तपस्या हे मूळ करण आहे. तपस्या वसना नाशातून उत्पन्न होत असते. जेथे वासना आहेत तेथे खरी तपस्या शक्य नसते. वासनांच्या आहारी गेलेला कधीच तपस्या करू शकत नाही. योगाने जे साध्य होते ते साध्य करण्यासाठी हजार अश्वमेध किंवा शंभर वाजपेयी यज्ञ पुरेसे नसतात. अशा परिस्थितीत मी तुला शुकाच्या जन्माची कहाणी सांगणार आहे. त्यानंतर तो कसे ज्ञान मिळवतो, त्याची तपस्या, त्याने मोक्ष कसा साध्य केला ते सांगणार आहे. परंतु, ते समजण्यासाठी श्रद्धा असली पाहिजे ज्याच्या मनात शंकाकुशंका आहेत तो ते समजू शकणार नाही. एकदा मेरू पर्वताच्या एका शिखरावर जेथे लाल फुलांची झाडं होती तेथे महादेव त्यांच्या विलक्षण अशा गणांबरोबर आणि पिशाच्चांबरोबर बसले होते त्यांच्या आसनावर. त्यांच्या साथीला पर्वताची कन्या पार्वती सुद्धा होती. जवळच एका शिखरावर व्यास त्यांची तपस्या करत होते. ते धारणा योग करत होते. त्याना मुलगा व्हावा अशी इच्छा झाली होती व ती पूर्ण करण्यासाठी ती तपस्या ते करत होते. ते प्रार्थना करत असतात कीं त्यांना असा मुलगा हवा होता किं,

जो पंचमहाभूतांचे तेज धारण करेल. ते ज्या देवाची पुजा करत होते त्याची पुजा कोणी साधारण कधीच करू शकणार नाही. त्यांची साधना अनेक वर्षे चालू होती. ते केवळ हवा खाऊन जगत होते. ते महादेवाचे त्याच्या स्त्री तत्त्वासह ध्यान करत होते. त्या वेळी सगळे देव आणि ऋषी त्या परिसरात वावरत होते. त्यामध्ये साध्य, वसू, आदित्य, रुद्र, सूर्य, चंद्रमा, मरुत, सागर देवता, नद्यांच्या देवता, अश्विन, गंधर्व, अप्सरा, नारदमुनी आणि ऋषी पर्वत, इतर सिद्ध तेथे होते जेथे शंकर देव त्यांच्या स्थानी विराजमान होते. त्यांच्या गळ्यात लाल फुलाच्या माळा होत्या. त्यांच्या भोवती चंद्राचा प्रकाश पसरलेला होता. अशा प्रसन्न ठिकाणी व्यास त्यांची धारणा करत होते. पुत्र प्राप्तीसाठी ती होती. ते त्यांचे तप सगळी तिनही जग आश्चर्यचकीत होऊन पहात होती. व्यासाचे तेज अवर्णनीय होते. ऋषी मार्कंडेय ज्यांच्याकडून मला जे समजले ते सांगत आहे. ते मला नेहमी विविध देवतांच्या आणि ऋषींच्या कथा सांगत असत. व्यासांची तपस्या पाहून महादेव प्रसन्न झाले. तो त्रिनेत्र स्मित करत व्यासांना बोलतात, "तुझी साधना संपन्न झाली आहे. तुला एक मुलगा होईल. जो तुला हवा तसा असेल. त्याच्यामध्ये पंचमहाभूतांचे तेज असेल. तो जाणून असेल कीं, तो ब्रह्माचा अंश आहे. त्याचे ध्यान सदैव ब्रह्माकडे असेल. तो सदैव ब्रह्मरुप असेल.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकावन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे बावन्नावा

भिष्म पुढे सांगत असतात, सत्यवतीचा मुलगा तो वर मिळाल्यावर एकदा यज्ञासाठी अग्नी चेतवण्यासाठी लाकडाच्या दोन काठ्या घासत होता. ते करत असतांना त्याची नजर अप्सरा घृताची तेथे होती तिच्यावर पडते. तिचे सौंदर्य फार आकर्षक होते. तिला पहातांच व्यासांना प्रेमभाव उत्कट झाला. घृताचीला ते समजते. त्याची वासना त्याच्या सगळ्या अंगात भिनते. व्यास ती संयमित करण्यासाठी पराकाष्ठा करतात. परंतु, त्याला त्यात यश येत नाही. जे घडणार होते ते अटळ होते. त्यांना घृताचीचे आकर्षण नियंत्रित करता येत नव्हते. तिच्या आकर्षणामुळे शेवटी व्यांसांचे वीर्य बाहेर येते. तरी ते त्यांचे अग्नी उत्पन्न करण्यासाठी काठ्या घासणे तसेंच चालू होते. ते वीर्य खाली पडले त्यातून शुकाचा जन्म झाला. अशारितीने त्या महान योग्याचा, शुकाचा जन्म झाला आहे. त्याचे तेज अग्नीसारखे होते. त्याचे रुप घृताची सारखे सुंदर होते. जणूकाय तो तिच्या उदरी जन्मला आहे. त्यावेळी गंगा नदी रुप घेऊन मेरूच्या शिखरावर आली. तिने शुकाला पहिली आंघोळ घातली. त्यावेळी आकाशातून एक सन्याशाची काठी आणि चर्मवस्त्र खाली आले. ते शुकासाठी होते. गंधर्व त्याच्या स्तुतीची गाणी गाऊ लागतात. अप्सरा फेर धरून नांचू लागतात. स्वर्गीय वाद्ये वाजू लागतात. गंधर्वांबरोबर विश्ववसू, तुंबुरू, नारद आणि प्रसिद्ध गंधर्व हाहा आणि हूहू तेथे होते. ते शुकाचे स्वागत करत होते. पर्जन्य देवांनी पर्जन्य वृष्टी केली. वायूदेव फुलांचा वर्षाव करतो. सगळ्यांना हर्ष झाला होता. महादेव तेथे उमासह आले व त्यांनी शुकाच्या अंगावर जान्हवे घातले. इंद्र त्याला कमंडलू देतो. अनेक पक्षी त्याच्या भोवती घिरट्या घालून त्यांचे स्वागत करतात. अशारितीने जन्मलेला शुक तेथे राहू लागतो. तो अनेक व्रत वैकल्ये करू लागतो. त्याच्याकडे वेदातील सगळ्या रहस्यमय गोष्टी येतात. त्यात शुक प्रजापतिला निवडतो. कारण त्याचे वेदाचे ज्ञान पूर्ण होते. तो त्याचा शिक्षक होतो. त्याच्या कडून शुक वेदाचा अभ्यास करतो. त्याशिवाय जी शास्त्र, विज्ञानं, तंत्र वेदात आहेत ती

सगळी तो आत्मसात करतो. ते शिकल्यावर तो त्याच्या शिक्षकाला त्याचे मानधन देतो व आपल्या घरी परततो. शुकाने ब्रह्मचर्याचे व्रत घेतले होते. त्यानंतर शुक घोर तपस्या करू लगतो. तरी तो एक लहान मुलगाच होता. त्यामुळें तो सगळ्यांच्या कौतुकाचा विषय झाला होता. शुकाच्या मनात इतर तीन आश्रमांबद्दल विशेष कल नव्हता. त्याचे सगळे ध्यान मोक्षाकडे होते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे बावन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे त्रेपन्नावा

भिष्म पुढे सांगतात, मोक्षाच्या इच्छेने प्रेरित झालेला शुक त्याच्या पित्यास बोलतो, "आपण मोक्षसिद्धी बद्दलचे सगळे जाणता, त्यासाठी मला कांहीं सांगू शकाल तर बरे होईल. त्यासाठी मन कसे तयार करावे ते सांगा. ते ऐकल्यावर त्याचे पिता व्यास त्याला सांगतात, कीं, तो सगळ्या कर्तव्याची माहिती करून घेईल. त्यानंतर तो सगळी शास्त्र शिकतो. त्यानंतर कपिलमुनींचे सांख्य शास्त्रसुद्धा तो शिकतो. त्याचे शिक्षण पूर्ण झाले ते पाहिल्यावर व्यास त्याला सांगतात कीं, तो जनक राजाकडे मिथिला नगरीला जाईल. तेथे राजा जनक त्याला मोक्षसिद्धीबद्दल पुढची माहिती देईल. ते ऐकल्यावर शुक मिथिला नगरीकडे रवाना होतो. व्यास त्याला निक्षून सांगतात कीं, तो साध्या माणसासारखा चालत तेथे जाईल त्याची योगशक्ति वापरून त्वरेने जाणार नाही. आणखीन सांगतात कीं, तो नम्रपणे तेथे जाईल शिकण्यासाठी म्हणून तेथे त्याचे ज्ञान दाखवण्याची चूक करणार नाही. वाटेत जातांना कोणी मित्र, आप्त अशांची संगत करू नकोस. पुढे ते सांगतात कीं, जरी त्यांचे कुटूंब मिथिला नगरीच्या राजाचे पुरोहित असले तरी तेथे जाऊन उच्चता न दाखवता नम्रपणे त्यांच्या कडून मोक्षसाधना शिकून घे. असे त्याच्या पित्याने सांगितले. त्याच्या आज्ञेत रहाशिल तर तुझ्या सगळ्या शंकांचे तो राजा समाधान करील. त्या विषयाचे ते चांगले जाणकार आहेत. अशाप्रकारे समजावून सांगितल्या नंतर तो मिथिलाकडे पायी निघाला. त्याच्या प्रवासात तो अनेक वनप्रदेश, डोंगर, नद्या ओलांडत तो जात होता. तेथे अनेक हिंस्त्र पशू त्याला दिसत होते. मेरुवर्ष ओलांडल्या नंतर तो हरीवर्षात येतो. त्यानंतर तो भारत वर्षात पोहोचतो. त्याने अनेक देश पाहिले ज्यात चीनी आणि हूण (मंगोल) लोक रहात होते. अखेरीस तो महान वैरागी आर्यवर्तात येतो. आपल्या पित्याच्या सूचना चांगल्या लक्षात घेऊन तो प्रवास करत होता. विविध प्रदेशांतून जाताना त्याला कित्येक गोष्टी दिसतात व त्याच्या सामान्य ज्ञानात भर पडते जे शक्य नव्हते जर तो योगीक सिद्धीने उडत गेला

असता. म्हणून शुकाला त्याच्या पित्याच्या सल्ल्याचे महत्व समजते. अनेक तिर्थक्षेत्रे तो पहातो. अखेरास तो विदेहात येतो. जेथे जनकाचे राज्य होते. सुंदर बागा, शेतं, पशुधन असे बरेच तो पहात होता. शेत, तळी, उपवनं तो पहात होता. भाताची शेतं तो पहात होता जेथे धान्य विपुल उगवत होते. तेथे हंस, मोर असें पक्षी बागडत होते. विपुल पशुधन तो पहात होता. तळ्यांत कमळं होती. विदेह राज्य समृद्ध होते. चांगले कपडे घातलेले लोक तो पहात होता. अशा रितीने तो मिथिला नगरीत आला. तेथे अनेक प्रकारचे वृक्ष तो पहातो. सुंदर बागा तो पहातो. धनगर त्यांची जनावरं घेऊन चरावयाला जात होते. त्या नगरीत हत्ती, घोडे आणि त्यांनी खेचले जाणारे रथ तो पहातो. परंतु, तो त्या आकर्षक गोष्टींकडे दुर्लक्ष करत जनकाच्या घराकडे जात असतो. जनकाच्या वाड्यात आल्यावर तो त्याचा निरोप राजाकडे धाडतो. एवढे चालून आल्यानेसुद्धा तो अजिबात थकलेला नसतो. त्याला भूक अथवा तहान लागलेली नसते. सूर्याच्या उष्णतेने तो भाजला गेला नव्हता. तेथे असलेल्या एका द्वारपालाला त्याचे लहान रुप पाहून शुकाबद्दल सहानुभूती वाटते. तो त्याला राजाच्या वाड्यातील एका दालनाकडे सन्मानपूर्वकपणे नेतो. शुक तेथे आसनस्थ होतो. लवकरच राजाचे एक मंत्री त्याला दुसर्या दालनात नेतात. ते दालन प्रशस्थ होते. राजवाड्याचा तो एक हिस्सा होता. त्यात सुंदर बगीचे होते. गंधर्व चित्ररथाच्या उद्यानां सारखे ते होते. तेथे सुंदर मुली देखरेख करत होत्या. तो मंत्री शुकाला आणखीन एका दालनात नेतो व तेथील दास्यांना शुकाची काळजी घ्यावयास सांगतो. त्या सगळ्या उत्तम कपडे घातलेल्या होत्या व त्यांच्या अंगावर दागिने होते. त्या चांगल्या शिष्टाचार संपन्न होत्या. त्यांची स्मित करण्याची, बोलण्याची पद्धत सुख देणारी होती. त्या मुली शुकाला तेथे बसण्यासाठी आसन देतात. त्या पृथ्वीवरील अप्सरा होत्या. त्या देखण्या मुली शुकाभोवती गराडा घालतात. त्या त्याचे स्वागत करतात. त्याला हात पाय धुण्यासाठी पाणी देतात. त्याला उत्तम पेये पिण्यासाठी देतात. ते खाल्यानंतर त्याला त्या सभोवारचे बगीचे दाखवत असतात. त्या त्याच्याबरोबर हसत खिदळत गप्पा मारत तो प्रदेश दाखवत असतात. शुक ते सगळे कोणतीही अयोग्य प्रतिक्रिया न देता अनुभवत असतो. त्यानंतर त्यातील एक अतिसुंदर मुलगी शुकाचे हात, पाय आणि इतर भाग

स्वताच्या कोमल हातांने धुते. तेवढ्यात संध्याकाळ होते म्हणून शुक संध्याकाळची प्रार्थना करतो. त्यानंतर ते त्याचे नित्याचे योगासने करू लागतो. त्यानंतर तो त्या रात्री निजतो. पहाटे तो उठून स्नान उरकतो. त्यावेळी त्याच्या भोवती त्या सुंदर मुली होत्या. तो मात्र योगसाधनेत गुंग झाला होता. अशारितीने तो व्यासांचा मुलगा त्या रमणींच्या सहवासात तेथे जनकांच्या वाड्यात रहात असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे त्रेपन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे चौपन्नावा

भिष्म पुढे सांगतात, दुसर्या दिवशी पहाटे राजा जनक त्याच्या मंत्र्यांबरोबर व सगळ्या त्याच्या परिवारासह शुकाला भेटण्यास येतो. त्याने त्याच्या बरोबर मौल्यवान दागिने, रत्नं आणि श्रीमंती पेहेराव अशा भेटी आणल्या असतात. त्याशिवाय अर्घ्य देण्याची सामुग्री सुद्धा असते. ते सगळे साहित्य राजाचे कुटूंबिय त्यांच्या माथ्यावर घेऊन येतात. राजा त्याच्या मंत्र्यांकडून ते घेत शुकाला मोठ्या सन्माने अर्पण करतो. शुक त्या मौल्यवान आसनावर स्थानापन्न होतो. राजा त्याची पुजा अर्घ्य देऊन करतो रिवाजानुसार. शुक ते योग्यमंत्र उच्चारून स्वीकारतो. अशारितीने शुक ती पुजा (सन्मान) झाल्यानंतर त्याला दिलेले पशुधन स्वीकारतो. तो राजाला वंदन करतो. त्यावेळी तो राजाचे क्षेमकुशल विचारतो. त्याच्या समृद्धीसाठी नंतर तो प्रार्थना करतो. त्यामध्ये तो राजाच्या परिवाराचे आणि मंत्र्यांचेसुद्धा कल्याण चिंतीतो. त्यानंतर राजा शुकाच्या परवानगीने तेथे जमिनीवर बसतो. तो उच्चकुलिन राजा हात जोडून व्यासांचे क्षेमकुशल विचारतो. त्यानंतर राजा त्याला येण्याचे निमित्त काय म्हणून विचारतो. शुक सांगतो, "माझे पिता ज्याची तुमच्यावर कृपा आहे ते मला बोलले कीं, आपले मोक्षाचे ज्ञान पूर्ण आहे व ते मला शिकावयाचे आहे. तेव्हां ते मला बोलले कीं, मी तुमच्या कडून ते शिकावे तुमचा शिष्य होण्यासाठी आलो आहे. सांख्यांच्या विचारात सांगितलेले प्रवृत्ती आणि निवृत्ती ह्यांबद्दल मला शंका आहेत त्यांचे निरसन आपल्याकडून चांगले होईल असें ते म्हणाले व मला आपल्याला भेटण्यास सांगितले म्हणून आलो. आपण माझ्या पित्याची इच्छा पूर्ण कराल अशी माझी अपेक्षा आहे. आपण त्याबाबत सर्वज्ञ अहात हे सगळे जग जाणते. त्यात मला जे प्रश्न आहेत ते मी आपल्याला विचारणार आहे. पहिले तीन प्रश्र आहेत, ब्राह्मणाची कर्तव्ये कोणती? त्या कर्तव्यामुळे मोक्ष साधना कशी शक्य होते? मोक्ष तपस्येमुळेंप्राप्त होते कां ज्ञानामुळें"?

जनक सांगतात, प्रथम ब्राह्मणाची कर्तव्ये कोणती ज्यामुळे त्याला मोक्ष साध्य होतो ते सांगतात, त्या ब्राह्मण मुलाची मुंज झाल्यावर तो गुरूगृही वेदांचा अभ्यास करण्यास जातो. तेथे गुरूची सेवा तो मनोभावे करतो. त्याशिवाय ब्रह्मचर्य पालन करतो. शिक्षण झाल्यानंतर तो त्याची दक्षिणा गुरूला देतो. त्यानंतर तो गुरूच्या आज्ञेने लग्न करून गृहस्थाक्षमात प्रवेश करतो. आपल्या पत्नीसह तो प्रामाणिक राहून त्याचा संसार करू लागतो. तेथे तो त्याचा गृहस्थाश्रमाचा अग्नी सांभाळत असतो. कोणत्याही गैर व्यवहारात तो कधी गुंतणार नाही. त्याचा संसार वाढत राहिल व तो त्याचा वंश पुढे चालवणारे पुत्र जन्माला घालेल. गृहस्थाश्रमाची सगळी जबाबदारी यथासांग पूर्ण झाल्यावर तो त्याला मुलापासून नातू झाल्यावर वनाश्रमी जाईल. तो त्याचा अग्नी घेऊन वनात जाईल. त्याचे सगळे आयुष्य तो चांगुलपणाने, प्रामाणिकपणे, मर्यादा सांभाळून, पवित्र, असे सदाचाराने (अनावश्यक क्रोध, मत्सर, द्वेष, गर्व इत्यादी दोष विरहीत) युक्त असे जगत असला पाहिजे. वनाश्रमात तो सगळ्या वासना विरहीत, चांगुलपणाने, त्याचे जीवन जगण्याचा प्रयत्न करत असेल. तो संन्याशी (सगळ्या वासनांचा त्याग ह्याला संन्यास म्हणतात) जीवन जगत असला पाहिजे. त्या वृत्तीला ब्रह्म वृत्ती असे म्हणतात.

शुक विचारतो, जर एकाद्याने त्याच्या सगळ्या वासनांचा स्वाभाविकपणे त्याग केला असेल, सगळ्या टोकाच्या (सुख-दुःख, आनंद-निराशा, प्रेम-द्वेष, मोह-औदासिन्य, पाहिजे-नको, क्रोध-समाधान, स्तुती-टीका, मान-अपमान, आदर-तिरस्कार, परकेपणा-आपुलकी, सुवर्ण-पाषाण, थंड-गरम, चांगले-वाईट, मान्य-अमान्य, जीवन-मृत्यू, आकर्षण-विरोध इत्यादि) भूमिकांतून जो मुक्त झाला आहे, अशा इसमाला त्या ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थाश्रम ह्या तीन आश्रमांची गरज असते कां"? असे विचारण्याचे कारण मला असे समजते कीं, हे तीन आश्रम त्या सगळ्या वासनांपासून मुक्त होण्यासाठी तयारी करण्यासाठी असतात. ज्याला त्या वासना मुळातच नाहीत तो कां त्या आश्रमांच्या प्रयोजनांचा उपयोग करील"? माझ्या शंकेचे निरसन कराल तर बरे होईल. वेद त्याबाबत काय सांगतात ते मला सांगा.

जनक सांगतात, जीवनाचे अनुभव न घेताच जर कोणी तसे ठरवत असेल की त्याला वासना नाहीत तर ते विज्ञान मान्य करू शकत नाही. एकादी वासना न भोगता ती नको असें म्हणणे अज्ञान मुलक समजले जाते. प्रत्येक अनुभव घेतल्यानंतर जर कोणी तसे ठरवेल कीं, त्याला वासना नाही तर ते अनुभवनसिद्ध म्हणून विज्ञानसिद्ध समजले जाते. कोणी आळसामुळे (तमोगुण) त्या वासना व त्यांचे भोग नाकारत असेल तर अशांना मोक्ष कधीच मिळणार नाही कारण, तशी वासनाहीनता प्रामाणिक नसते अशांच्या बाबत. त्यांच्या विविध वासना प्रसंगोपात उफाळून येऊ शकतात. म्हणून तसे समजणे कीं त्याला त्या वासना नाहीत हे मोक्षसाधनेच्या दृष्टीने उचित समजले जात नाही, परंतु, त्या आश्रमांच्या अनुभवानंतर तो खात्रीने त्याच्या वसनांत गुंतला आहे किंवा नाही त्याचा त्याला प्रत्यक्ष अनुभव वेळोवेळी घेऊन जो प्रयोगसिद्ध असतो तो येत असतो. त्यावरुन तो मोक्षसाधनेसाठी सुयोग्य आहे किंवा कसे ते ठरविण्यासाठी शहाण्या लोकांनी फार प्राचीन काळी ते नियम आखून दिले आहेत. अशारितीने अनेक जन्म तपस्या करत जो त्याच्या वासनांच्या गुंत्यातून मोकळा होतो त्यानेच मोक्षाचा विचार करणे उचीत असते. एकाद्याच्या वासना (बाह्य आणि सुक्ष्म वासना) केवळ मानण्याने नष्ट होत नसतात. जरी वरकरणी कदाचित असे भासत असले कीं तो वासना मुक्त आहे तरी खरेतर तसे नसते. म्हणून ह्या आश्रमांची गरज आपल्या पूर्वजांना आवश्यक वाटली त्याप्रमाणे त्यांचे प्रयोजन केलेले आहे. पहिला ब्रह्मचर्य पाळणे ह्यात खरी परीक्षा होत असते. ते स्वाभाविकपणे जमणे ज्याला शक्य झाले तो पुढच्या परीक्षेसाठी जात असतो. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्या मोक्षाच्या तीन नैतिक पायर्या सांगितल्या आहेत त्यात आपण किती खरे उतरत आहोत ते समजण्यासाठी ह्या तीन आश्रमांची गरज आहे असे जाणकार समजतात. कारण त्यात रहातांना जे विविध अनुभव येतात त्यातून त्याला स्वताची परीक्षा आत्मनिरीक्षणांने करता येत असते. त्याची अध्यात्मिक अवस्था सत्त्व, रज आणि तम ह्या तीन अवस्थांतून व्यक्त होत असते त्यांची पारख ह्या तीन आश्रमांतून जाताना माणसास होत असते. ते वनात राहून शक्य नसते. म्हणून ते खर्या अर्थाने मोक्षासाठी तयार आहेत कां नाहीत ते ठरवणे शक्य होते. माणसाच्या अहंकाराची सुद्धा परीक्षा त्या तीन आश्रमांतून तो जात असतांना त्याला होत

असते. तेथे तो अहंकार मिटवण्याची तयारी करू शकतो. जे ययातिबाबत झाले तसे होऊ नये म्हणून त्या तीन आश्रमांच्या चाचपणीतून जाणे योग्य समजले आहे. त्या तीन आश्रमांतून जात असतांना जर तो योग साधना करत असेल तर त्याची तयारी (मोक्षासाठी) चांगली होत असते. सगळ्या सहादोषांच्या अनुभवाने तो तयार होतो जेव्हां तो त्यांतून जात असतो. जो वनात बसून ध्यान करत आहे ज्याने वासनांच्या उद्रेकांचा अनुभव घेतला नाही तो त्यांच्या उद्रेकाच्या एकाच फटक्यात भ्रष्ट होत असतो. परंतु, जो तीन आश्रमांतून जाताना विविध वासनिक अनुभवांतून गेलेला असल्याने, तो तसा भ्रष्ट होत नाही. एकाप्रकारे हे तीन आश्रम ही मोक्षाच्या मार्गाची तयारी करण्यासारखे असते. म्हणून ते आपल्या पूर्वजानी आवश्यक म्हणून सांगितले आहेत. ज्याप्रमाणे अंधारात दिवा लावून आपण सगळे पाहू शकतो तसेंच इंद्रीयसंयमाने व विवेकांने जोगी आत्म्याचे दर्शन घेत असतो. मला माहित आहे कीं, मी जे सांगत आहे ते तुला आत्मबुद्धीने आधीपासून ठाऊक आहे. मी जे सांगणार ते सगळे तुला उपजत बुद्धीने आधीच माहीत आहे. तुझ्या पित्याच्या जो तुझा गुरूसुद्धा आहे, कृपेने मोक्षाची सगळी साधना तुला माहित आहे. तुझ्या पित्याच्या कृपेने मी ज्ञानी झालो आहे. तुला कल्पना नाही तू किती ज्ञानी आहेस. तुझी उपजत बुद्धी कोणाही पेक्षा श्रेष्ठ आहे. मी काय तुला शिकवणार"? जे प्रश्न तुला पडले आहेत त्याची उत्तर तुझ्या उपजत बुद्धीकडे आधीपासून आहेत. म्हणून तू माझ्याकडे आला आहेस किंवा तुझ्या पित्याने पाठवले आहे ते केवळ निमित्तमात्र आहे. तुला आधीपासून स्थिर बुद्धी प्राप्त झाली आहे. तू पहिल्या पासून ब्रह्माच्या म्हणजे मोक्षाच्या जवळ आहेस. तपस्येचे कष्ट न करता कोणालाही ते साध्य होण्यासारखे नसते. तुला टोकाच्या भूमिकांत (प्रतिक्रियांत) मध्ये फरक वाटत नाही. तसा ब्राह्मण ब्रह्माशी एकरुप होत असतो. त्याला चिरशांती मिळत असते. तू ब्राह्मणाला दिलेल्या कर्तव्यांचे पालन कर आणि मग मोक्षाला जा. आता आणखीन काय मी तुला सांगू ते विचार.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चौपन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे पचावन्नावा

भिष्म पुढे सांगतात, जनकाला गुरू स्थानी मानून शुक आत्मध्यानात (सोहम् साधना) त्याचा समय घालवू लागतो. त्याचे समाधान झाले होते तो जनकाचा निरोप घेऊन हिमालयाकडे वार्याच्या वेगांने कूच करतो. जेथे विविध अप्सरा आणि गंधर्व रहात असतात. तेथे विविध वनस्पति होत्या. त्यात भृंगराज, मङ्गूज, खंजरी, जिवजीवक इत्यादि होत्या, त्यांच्या रंगीबेरंगी फुलांनी हिमालयाची शोभा वाढली होती. मोर सगळीकडे नांचत होते. हंस पक्षी, कोकीळ, तेथील तलावांत बागडत होते. त्याशिवाय गरूडपक्षी अधून मधून तेथे टेहळणी करण्यासाठी घिरट्या घालत होते. लोकपाल देवता त्यांच्या उपदेवतांसह तेथे उपस्थित होते. त्याच ठिकाणी भगवान विष्णूनी घोर तपस्या फार प्राचीन काळी केली होती. देवांचे सरसेनापति कुमार त्यांचे लहानपण येथेच घालवत होते. अशी कथा आहे कीं, त्या अतिप्राचीन काळी कुमार त्याचा बाण धरतीवर फेकतो व आव्हान देतो कीं, जर कोणी असेल ह्या धरतीवर जो माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे तर तो हा बाण पकडेल. तेव्हां सगळे जग चिंतातूर झाले. ते एकमेकांना विचारू लागले कोणी तो बाण पकडावयाचा? ते विष्णूला विचारतात काय करावयाचे? विष्णू सगळ्या देवता, राक्षस आणि दानवांना विचारतो, कोणीही ते आव्हान घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. तो स्कंधाकडे तीक्ष्ण नजरेने पहातो. विष्णू त्याच्या तेजांनी तो बाण त्याच्या डाव्या हाताने पकडतो. त्यामुळें पृथ्वीवरील सगळे पर्वत, डोंगर, अरण्ये, नद्या, तलाव, समुद्र थरथरू लागले. असें करून तो स्कंधाचा मान ठेवतो. त्यानंतर विष्णू प्रह्लादाला बोलतात, स्कंधाचे सामर्थ्य पहा किती आहे, कोणीही त्याच्या आव्हानाला सामोरी गेले नाही. प्रह्लाद तो बाण पकडण्याचे ठरवतो. परंतु तो ते करू शकत नाही. तो बेशुद्ध होतो. तो हिरण्यकश्यपूचा मुलगा पृथ्वीवर फेकला जातो. तो ह्याच पर्वताच्या भागात पडतो जेथे महादेव मोठी तपस्या करत होते. जेथे तो तपस्या करत होता त्या जागे भोवती अग्नीने संरक्षक रिंगण केले होते

म्हणजे कोणी त्यांना त्रास देऊ नये. कोणीही अशुद्ध आत्मा तेथे पोहोचू शकणार नव्हता. त्या शिखराचे नांव होते आदित्य. ते रिंगण दहा योजने रुंदीचे होते. त्यात कोणी दानव, यक्ष, राक्षस शिरू शकणारे नव्हते. अग्नीदेव स्वतः तेथे देखरेख करत होते. असे ते एक हजार दैवी वर्षे होते. एका पायावर उभे राहून महादेव ते तप करत होते. अशी ती कथा आहे. त्याच हिमालयाच्या पायथ्याशी पराशराचा मुलगा व्यास त्याच्या शिष्यांना वेद शिकवत असे. त्याच्या शिष्यांत सुमंत, वैशंपायन, जेमिनी, पैल असें चार होते. शुक त्या आश्रमाकडे निघतो. तेथे व्यासांचे शिष्य त्यांच्या भोवती बसलेले होते. व्यास पहातात किं, त्यांचा मुलगा त्यांच्याकडे येत आहे. तो येत असतांना त्याला झाडे, वेली आणि खडक आड येत नव्हते. तो त्यांच्यातून आरपार येत होता. त्यावरून त्याचे अध्यात्मिक आणि योगिक सामर्थ्य स्पष्ट होत होते. शुक त्याच्या पित्याचे पाय पकडतो व आनंदाने त्या शिष्यगणांना अभिवादन करतो. त्यानंतर तो जे घडले त्याचा वृत्तांत सांगतो. ते दोघे त्या आश्रमात राहू लागतात. तेथे ते शिकवण्याचे कार्य करत असतात. एकदा ते व त्यांचे शिष्य एकत्र बसलेले होते. ते सगळे चांगले तपस्वी होते. त्यांचा वेदाचा व त्याच्या शाखांचा अभ्यास पूर्ण झाला होता. ते पांच शिष्य हात जोडून त्यांच्या शिक्षकाला बोलतात, "आपल्या कृपेने आमचे वेदाचे ज्ञान संपन्न झाले आहे. आपण आणखीन एक कृपा करावी अशी विनंति करत आहोत". व्यास बोलतात, "बोला मी तुमच्यासाठी काय करावे"? ते ऐकून त्यांचे सगळे शिष्य फार खूष होतात. त्यानंतर ते सगळे एकासूरात बोलतात कीं, आम्हाला एकच आशिर्वाद आपल्याकडून पाहिजे कीं, तुम्ही सहावा शिष्य तयार करणार नाही. व्यासाचे पांच शिष्य आहेत, सुमंत्र, वैशंपायन जेमिनी, पैल आणि शुक. ते ऐकून सगळ्यांचे हित पहाणारे त्यांचे गुरू बोलतात, "वेद केवळ ब्राह्मणांची मक्तेदारी असेल किंवा जे वेदाकडून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत, ज्यांना ब्रह्माच्या जवळ जाण्याची इच्छा आहे. त्यासाठी तुम्ही तुमचे शिष्यगण तयार करून वेद जास्तीत जास्त अभिजनांकडे पोहोचतील असें करावे. जो अधिकृतपणे तुमचा शिष्य झालेला नाही त्याला वेद शिकवू नका. तसेंच जो व्रतानी ब्राह्मण नाही तो वेद शिकणार नाही. जेथे पापाचरण होत आहे तेथे वेद गाईले जाणार नाहीत. जो ब्रह्मचर्य, चांगुलपणा, प्रामाणिकपणा, पावित्र्य,

नम्रता, शिष्टाचार मर्यादा पाळत नाही त्याला वेद शिकवू नका. वेद कोणापर्यंत पोहोचणार ते तुमच्यावर आहे. चांगली परीक्षा करून मगच तुम्ही तुमचे शिष्य निवडावेत. त्या चाचपणीत दुष्टपणा नसावा. त्यांचे जन्म किती शुद्ध आहेत, त्यांचे घराणे किती उच्च आहे, त्यांचे वळण कसे आहे ते सगळे तपासून मगच त्याला शिष्य करावे असें पराशराचा मुलगा त्याच्या शिष्यांना सांगतो. असे करतांना कोणतेही पापकृत्य तुमच्या कडून होणार नाही. त्याच्या शिकण्याच्या तयारीचे पहावे. त्याची तपस्या करण्याची तयारी तपासावी. ते करतांना जो योग्य असेल त्याला तुम्ही वेदाचे ज्ञान द्याल मग तो कोणत्या वर्णाचा आहे ते पाहू नका. तो तुमच्या चाचणीत उत्तीर्ण झाला म्हणजे तो ब्राह्मण झाला असें समजा. अशारितीने वेद शिकण्याची पद्धत निश्चित झाली. वेदातील बराच भाग देवतांची स्तुती करण्यासाठी असतो. ब्राह्मणांचा अपमान करणार्याला वेद शिकवावयाचे नाहीत. जो अहंकारी आहे तो वेदातील ती स्तुतीकवन गाणार नाही. ते त्यांच्या शिष्याना बोलतात कीं, वेदाच्या अभ्यासाचे नियम काय ते सांगितले त्या प्रमाणे वेदाचे ज्ञान पसरवा.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे पंचावन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे छप्पन्नावा

भिष्म पुढे सांगतात, ते ऐकून त्यांचे शिष्य मोठ्या उत्साहाने एकमेकांना मिठ्या मारतात. ते त्यांच्या गुरूला आश्वासन देतात कीं, त्या नियमांचे काटेकोरपणे पालन ते करतील. त्यानंतर ते व्यासाचे शिष्य त्यांच्या गुरूची परवानगी मागतात कीं, ते तो पहाड उतरून मानव वस्तीकडे प्रयाण करतील. त्यामुळें वेदाचा प्रसार करणे शक्य होईल. तुमच्या चांगुलपणाने तुम्ही ते ज्ञान पृथ्वीमध्ये पसरवाल. लोकांचे भले कराल. व्यास त्याच्या शिष्याना सावधानतेचा इशारा देतात कीं, वेदाचा चुकीचा अर्थ काढणारे येतील त्यांच्या पासून वेदाला संरक्षण देत रहा. त्यानंतर ते चार शिष्य त्यांच्या गुरूला प्रदक्षिणा करून निघतात. पृथ्वीवर उतरल्यानंतर ते प्रथम अग्निश्तोम यज्ञ करतात. त्यानंतर इतर यज्ञ करतात व त्यानंतर ते ब्राह्मणांना व क्षत्रियांना आणि वैश्यांना वेदाचे शिक्षण देण्यास प्रारंभ करतात. ते गृहस्थाश्रम स्वीकारतात. त्यांची ख्याती सर्वत्र पसरते. इतरांचे यज्ञ करण्याचे काम त्यांना मिळते. व्यास मात्र त्यांच्या आश्रमातच रहातात. त्याच्या बरोबर त्याचा शुक असतो. त्या आश्रमाच्या एकांतात ते विचार मग्न असे रहात असतात. त्या सुमारास नारद तेथे आले. ते व्यासाला पहातात. त्याला बोलतात, "अहो वसिष्ठाच्या कुळातील ब्राह्मणा, वेदांचा आवाज हल्ली कमी झाला आहे त्याचे कारण काय? तू कोणत्या काळजीत विचारमग्न रहात आहेस? वेदाच्या घोषांचा आवाज बंद झाल्यामुळे तुझा आश्रम एकाद्या निशादाच्या गांवासारखा वाटत आहे. ऋषी, गंधर्व असे दैवी लोक कोठे दिसत नाहीत"?

व्यास त्याला उत्तर देतात, "अहो स्वर्गीय ऋषी, वेदाचे चांगले जाणकार, तुम्ही जे म्हणता ते खरे आहे. तुमच्या प्रश्नाचा ओघसुद्धा मला समजतो. जे कांहीं ह्या त्रिलोकात घडणार आहे तेसुद्धा आपण जाणता. मी माझ्या शिष्यांपासून वेगळा झालो आहे. त्यांच्या वियोगाने मी खिन्न झालो आहे.

नारद बोलतात, "वेदाचे घोष थांबणे ह्यात वेदाचा नाश असतो हे तुम्हाला माहित आहे नां"? ब्राह्मणाचा दोष त्यांच्या व्रतस्थ न रहाण्यात असतो. वल्हीक (अरब) वंश पृथ्वीला लागलेला दोष आहे. कुतुहल हा स्त्रीचा दोष आहे. तू तुझ्या बुद्धीमान शुकाला वेदाचे घोष करावयाला कां सांगत नाहीस"? त्यांच्या आवाजाने सगळे असुरी विचार संपुष्टात येतील".

भिष्म पुढे सांगतात, नारदाचा प्रस्ताव ऐकून व्यासांना आनंद होतो. ते बोलतात, तथास्तु, ते स्वतः मोठ्या आवाजात वेदाचा घोष प्रारंभ करतात. त्यांच्या निर्दोष घोषामुळे सगळे आसमंत भरून निघते. असें होत होते एकदा त्या वेळी ते पितापुत्र वेदाचे घोष करत असतां, वादळी वारे वाहू लागतात. ते पाहून व्यास समजतात कीं, वेदाच्या घोषाची ही वेळ नाही. व्यास शुकाला वेदघोष थांबवण्यास सांगतात. ते पाहून शुकाची उत्सुकता वाढते कीं, कां घोष थांबवले? वादळी वारे आणि वेदघोष ह्यांचा काय संबंध"? शुकाचा प्रश्न ऐकून त्याच्या पित्याला आश्चर्य वाटते. व्यास त्याच्या समाधानासाठी त्याला बोलतात, "अरे शुका, तुला दैवी दृष्टी असूनही ते समजले नसेल तर सांगतो, कां अशा वादळात वेदाचे घोष करावयाचे नाहीत. ह्या सृष्टीचे शरीर आहे ज्याची छोटी प्रतिकृती असते आपले शरीर. ब्रह्माच्या मार्गाला देवयान म्हणतात. तो सात्त्विक असतो. त्याशिवाय दुसरा मार्ग आहे, पितृयान. तो तमोगुणी असतो. त्या मार्गाने जाणारे नरकात पडतात किंवा पुन्हा पुन्हा पृथ्वीवर जन्म घेतात. देवयानाने जाणारे स्वर्गात जातात. जे वारे वहात असतात, पृथ्वीवर आणि आकाशात त्यांचे सात प्रकार असतात. त्यांची माहिती सांगतो ती ऐक. शरीराला जाणीवां समजण्यासाठी ज्ञानेंद्रिय असतात. त्यांचे नियंत्रण साध्य देवता करतात. हे सृष्टीचे शरीर व आपले शरीर ह्या सगळ्यांना लागू असते. त्यांनी समान नांवाचा वायू उत्पन्न केला. त्या वायूतून उदान वायू तयार होतो. उदानातून व्यान वायू तयार होतो. त्या व्यानातून अपान वायू तयार होतो. त्या अपान वायूतून प्राण वायू तयार होत असतो. प्राणाला कोणी झाले नाही. ह्या वायूंचे कार्य काय ते सांगतो. ते जीवाच्या जगण्यास कसे मदत करतात ते सांगतो. त्यात प्राण वायू जगण्यास मदत करणारा असतो. त्यातील समान ज्याला प्रवह असे सुद्धा म्हणतात तो धूर, धूळ, उष्णता कण असें घेऊन त्याच्या मध्ये

आलेल्या बाष्पाचे ढगं तयार करतो. त्याच्यातून विजांचा कडकडाट होत असतो. दुसरा वायू उदान येतो तो मोठा आवाज करतो (माणसाच्या बाबत ढेकर), सृष्टीत ढगांचे गडगडाट होतात. पाऊस पडण्यात मदत करतो. तिसरा उद्वाह, किंवा अपान त्यामुळे आकाशात ढगे सगळीकडे पसरवली जातात, शरीरात तो पाद तयार करण्याचे काम करत असतो. ज्याच्या जोरामुळे मळ पुढे सरकत असतो. सृष्टीत तो वादळं निर्माण करतो उलथापालथ करतो. त्या बरोबर असणार्या ढगांना वल्हक म्हणतात. त्यांच्यामुळे निसर्गात संहार होऊ शकतो. त्याच्यामुळे जे आवाज आकाशात (आणि शरीरात) होतात ते विवाह म्हणून ओळखले जातात. सहावा वायू सगळी ढग आकाशात धरून ठेवतो आणि पाऊस पडू देत नाही. तो ढगांना आणखीन वर नेत असतो ज्यामुळे त्यातील पाण्याचे हिम होते व गारा पडतात. तो वायू ढगांच्या मदतीने सूर्याला झाकत असतो त्याच्या किरणांची ताकद कमी करत असतो. त्यानंतरच्या वायूला ज्ञानी लोक परिवाह असें सांगतात. तो सर्व नाश करणारा असतो. तो यमाचा दूत असल्यासारखा असतो. योगी त्याचे नियंत्रण करत असतात. त्याच्या योगाने दक्षाचे हजारो नातू मोक्षास जाऊ शकले. त्यानंतर आहे वायू ज्याला परावह असें सांगतात. तो सगळ्यात जास्त शक्तिमान असतो. त्याला कोणी अडवू शकत नाही. त्याला विष्णूचा श्वास असे ऋषी समजतात. त्याच्या जोरदार वहाण्याने सगळे हलू लागते. जेव्हां असा वायू वाहू लागतो तेव्हां वेदाचे घोष करावयाचे नसतात. कारण वेदघोष स्वता त्याच्या बरोबरीचे असतात ताकदी मध्ये. एवढे सांगून ते शुकाला सांगतात त्यासाठी त्यांने त्याला वेदाचे घोष करण्याचे थांबवले. त्यानंतर व्यासमुनी गंगेत स्नान करण्यासाठी निघून गेले.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे छप्पन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे सत्तावन्नावा

भिष्म सांगतात, व्यास तेथून गेल्यावर नारद शुकाकडे जातात. जो धर्मशास्त्र तयार करत असतो. नारद त्याला वेदातील कांहीं कवनांचा अर्थ विचारण्यासाठी आले होते. नारदाला आलेले पाहून शुक त्यांचे स्वागत करतो व अर्घ्य देऊन त्यांची पुजा करतो. जसे वेदात सांगितले आहे. त्याच्या पुजण्यामुळें नारद प्रसन्न होतात. ते शुकाला विचारतात, "मला सांग शुका, मी तुझ्यासाठी काय करावे म्हणजे तुला आनंद होईल"? ते ऐकल्यावर तो त्यांना सांगतो, ज्यात माझे भले आहे असे काय ते करा. ते ऐकल्यावर नारद बोलतात, "फार प्राचीन काळी ऋषी सनतकुमार त्यांना सत्याची माहिती विचारणार्या ऋषींना सांगतो कीं, ज्ञान हा श्रेष्ठ नेत्र आहे. त्याच्या सारखा डोळा नाही. सर्वत्यागा सारखी तपस्या नाही. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया, ब्रह्मचर्य, वैराग्य, ब्रह्मावरील श्रद्धा, देवतांचा आदर करणे (त्यांची पुजा करून), प्रामाणिकपणा, मर्यादा पाळणे असे करणार्याला सत्याची (ब्रह्माची) पारख होते. कारण त्या गुणांत तो ब्रह्म असतो. मानव जन्म मिळाला कीं, त्याच्या भोगात जो रमला तो भ्रष्ट झाला. त्याला मोक्ष कधीच प्राप्त होत नाही. सुखाच्या शोधात जे असतात ते दुःख प्राप्त करत असतात. तो अधिकाधिक त्यात अडकत जातो. त्या भोग साधनेत अडकलेला मोक्ष न मिळवता मृत्यू मिळवत असतो. मेल्यानंतर सुद्धा त्या अपूर्ण इच्छांच्या स्मरणाने तो त्या दुसर्या (पिशाच्च, भूत योनी) तडफडत असतो, त्याला शांति मिळत नाही. इच्छा अपूर्तीतून क्रोध उत्पन्न होतो. तो त्याला आणखीन खाली ढकलत असतो. इच्छा पूर्ती झाली तर त्यातून गर्व निर्माण होतो तो त्याचा तमोगुण वाढवून त्याची अध्यात्मिक अवस्था आणखीन खाली ढकलत असतो. सहानुभूती (सत्पात्र) हा मोठा गुण आहे. क्षमाशिलता ही मोठी ताकद आहे. स्वताच्या मर्यादा समजून वागणे ही मोठी मर्यादा आहे. बोलतांना हित कारक बोलावे जरी ते असत्य असले तरी कारण हितचिंतनात अध्यात्मिक बळ असते. हित आणि खरे ह्यात हित जास्त महत्वाचे आहे. खर्याने जर नुकसान होत असेल तर ते खरे असत्य समजावे.

ज्यानी मोह सोडला त्याला लोभ रहात नाही. त्यामुळें त्यातून येणारे दुःख त्याला भोगावे लागत नाही. असा मनुष्य सगळ्या मोहांपासून मुक्त असल्याने समाधानी असतो.
सगळे वास्तविक जग आणि महत किंवा बुद्धी पंचमहाभूतांचे बनले आहेत. त्यातील महत ब्रह्माशी निगडीत असते. आपली पांच ज्ञानेंद्रिय सत्त्व, रज आणि तमो गुणाच्या ताब्यात असतात. ते सगळे अव्यक्त आणि व्यक्त स्वरुपात असतात. ते शरीराचे कार्यकारी असतात त्यांचे नियंत्रण करणारा अव्यक्त भाग जो मन आणि बुद्धीचा बनला आहे व जो शरीराचे कार्य पहातो त्याला जीव म्हणतात. तो आत्म्यापेक्षा वेगळा असला तरी त्याचे कार्य आत्म्याच्या अध्यात्मिक उर्जेने चालत असते. शरीराच्या व्यक्त गोष्टींचे सगळे व्यवहार जीव पहात असतो. तो पाप, पुण्य, हित आणि सुख अशा जीवनातील शरीराशी संबंध असलेल्या सगळ्या चीजा पहात असतो. मृत्यू शरीराचा झाला कीं, जीव जो त्या शरीराचा हिस्सा असतो त्याच्या बरोबर संपतो परंतु, त्याने केलेले कर्म लिंगदेहात नोंदलेले असते. जो आत्म्या बरोबर असतो. मृत्यूनंतर तो ते सगळे कर्माचे हिशोब आत्म्याबरोबर राखून असतो. जे नंतरच्या जन्मात त्या आत्म्याला भोगावयाचे असतात. ज्याला हे माहीत आहे तो त्याच्या जन्मात फार सावधगिरीने कामं करत असतो. परंतु, जो त्या बद्दल निष्काळजी असतो तो अनेक चुका करत (सुखाच्या शोधात) आपली अध्यात्मिक उर्जा खर्च करत खालच्या योनीत नंतरच्या जन्मात जात असतो. ज्याला अध्यात्मिक उर्जेचे व्यवस्थापन करण्याचे जमले तो मोक्ष साध्य करतो विनासायास.
अरे शुका, मी तुला सनतकुमारांचे सांगितले आता तू ते अध्यात्मिक उर्जेचे व्यवस्थापन चांगले आत्मसात कर म्हणजे तुझा मोक्षाचा प्रवास निश्चित असेल. तुझ्यात ते सगळे गुण आहेत म्हणून भोगेंद्रियाच्या मोहात न अडकता तू तुझा अध्यात्मिक प्रवास करत जा. तुझ्या आधीसुद्धा कित्येक भोगेंद्रियां बद्दल औदासिन्य पत्करून मोक्षाचा मार्ग लिलया पार करून गेले आहेत.
नारदाच्या त्या शिकवणूकीने शुक पूूर्ण सावध झाला.
मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सत्तावन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे अठ्ठावन्नावा

नारद पुढे सांगतात, वेदाचे गायन ऐकल्याने तो धन्य होतो. त्याला मनःशांती प्राप्त होते. आनंद मिळतो. त्याची सगळी दुःख नाहीशी होतात. ज्यांचे ज्ञान अपुरे असते त्यांना प्रत्येक अनुभव दुःखदायक असतो. जे सूज्ञ असतात ते त्यातून निभावतात. ते समजण्यासाठी मी तुला कांहीं जुने किस्से ऐकवू इच्छितो. ते ऐकलेस तर तुझ्या मनाला समाधान मिळेल. नको त्या वासनांत रमणारे आणि ज्यात रमले पाहिजे त्याकडे दुर्लक्ष करणारे दुःख स्वतावर ओढवून घेत असतात. तसे जगणारे कधीच मोक्षप्राप्त करू शकणार नाही. मोह टाळण्यासाठी ज्याबद्दल मोह उत्पन्न झाला त्याबद्दल मनात तुच्छता उत्पन्न केल्याने त्याचा मोह नष्ट होत असतो. होऊन गेलेल्या घटनांवर जो दुःख करत बसतो तो कधी पुढे जात नाही. यश आणि अपयश समान समजणारा त्यांबद्दल आनंद आणि दुःख करत नाही. असा योगी मोक्ष सहजपणे साध्य करत असतो. दुःख करण्याचे व्यसन लागू शकते तशा मानसिक व्यसनामुळे माणसाचा अध्यात्मिक र्हास होतो. चुकांतून जे अपयश येते त्यामधून शिकावयाचे असते. त्या पुन्हा होणार नाही ह्याची दक्षता बाळगावयाची असते. केवळ त्याबद्दल हळहळ करण्याने कांहीं साध्य होणार नसते. ऐहीक जीवनात सुखा पेक्षा दुःख जास्त असते त्याचे कारण ते दुःख तुम्हाला मोक्षाकडे ढकलेल अशी ब्रह्माची अपेक्षा असते. परंतु, मनुष्य ब्रह्माचा उद्देश समजत नाही. तो दुःखात अडकून घेतो. ऐहिक जीवनातील अपयश, दुःख मोक्षाचे दरवाजे असतात म्हणून त्याकडे त्या दृष्टीने पहावयाचे असते. सृष्टीचा नियम आहे कीं, जे वर गेले ते खाली येणारच आणि पुन्हा वर जाणार आणि पुन्हा खाली येणार. जो हा नियम समजून आपल्या जीवनातील यश आणि अपयश, फायदा आणि नुकसान पहातो ते विचलित होत नाही. काम करत रहाणे हा निसर्गाचा संदेश आहे. त्यातून किती मिळेल अथवा नाही मिळणार त्याची चिंता करावयाची नाही काम मात्र निर्दोष करत आहोत कीं नाही ते पहावे. अशारितीने जे योगी कामं करतात ते यशस्वी होतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे अठ्ठावन्नावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एकोणसाठावा

नारद पुढे सांगतात, सुख दुःखाचे प्रसंग येतच असतात विशेषकरून गृहस्थाश्रमात ते कोणी टाळू शकत नाही. त्यांच्याकडे निरीक्षकाच्या दृष्टीने जो पहातो त्रयस्थासारखा, तो त्यांवर मात करत असतो. परंतु, जो त्यात गुंततो तो मात्र त्याच्या आगीत भाजून निघतो. परंतु, जो ब्रह्माच्या भक्तीने ते सगळे चांगले वाईट त्याला (त्याच्या आराध्य देवतेला) अर्पून जगतो त्याला त्या आगीच्या झळा भाजत नाहीत. अशाप्रकारे जे फार पूर्वी त्यांच्या सुखदुःखावर मात करून स्वर्गात गेले ते देव देवता बनले आणि ते मानवाला मार्गदर्शन करत आहेत. नारदाच्या सांगण्याचा शुक असा अर्थ समजतो कीं, गृहस्थाश्रमात मनुष्य त्याच्या मुलाबाळात बायका मुलांत न अडकता जर राहू शकत असेल तर तो मोक्षापर्यंत जाऊ शकतो. शुकाला प्रश्न पडतो असा कोणता मार्ग आहे ज्यात दुःख नाही आणि फक्त समृद्धी आहे. त्याला ज्या गृहस्थाश्रमाचा मार्ग सांगितला होता तो पहाता, तो प्रश्न विचारतो, मी सगळ्या बंधनातून मुक्त कसा होईन उत्तम प्रकारे"? त्यामुळे मी जन्म मरणाच्या साखळीतून मुक्त होईन. सर्व वासनांची बंधनं शरीरातून उत्पन्न होत असतात. मी त्या शरीराच्या वासनांत न अडकता जर गृहस्थाश्रम संपन्न केला तर ते शक्य होईल असें तो समजत असतो. परंतु, त्यासाठी त्याला योगमार्गाचा उपयोग करावा लागणार होता. कारण योग मार्ग शरीराच्या मर्यादा नियंत्रित करण्यासाठी उत्तम असतो. त्यापद्धतीने मला शरीराची गरज रहाणार नाही. त्यासाठी तो सूर्य देवाची प्रार्थना करण्याचे ठरवतो. शुक सूर्यलोकात जाऊन रहाण्याचे ठरवतो. माझ्यात सूर्याची शक्ती येईल. मी सगळ्या प्राण्यांवर दानवांवर, राक्षसांवर, गंधर्वांवर, पिशाच्चांवर असेन. ते माझे योगबळ पहात असतील. नारदाला तो त्याचा इरादा सांगतो आणि त्याच्या परवानगीने तो त्याच्या पित्याकडे निघतो. शुक व्यासाला प्रदक्षिणा घालतो. त्याचा इरादा ऐकल्यावर ते फार खूष झाले. ते त्याच्या मुलाला सांगतात,

कीं, तो काहीं काळ त्यांच्या बरोबर राहिल म्हणजे ते त्याला डोळे भरून पहातील. परंतु, शुक त्यांच्या इच्छेबद्दल फारसा उत्सूक दिसला नाही. तो फक्त मोक्षाचा विचार करत होता. तो कैलासाकडे निघाला जेथे बैराग्यांचे जथ्थे रहात होते.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकोणसाठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे साठावा

भिष्म पुढे सांगतात, "त्या शिखरावर गेल्यानंतर तो व्यासाचा मुलगा एका समपातळी खडकावर बसतो. तेथे कोणी हिंस्र पशू नव्हते. योग्य दिशेकडे त्याची नजर ठेवून तो योग साधना प्रारंभ करतो. तो त्याच्या आत्म्यावर लक्ष केंद्रीत करून ध्यान करू लागतो. तेव्हां सुर्य उगवला नव्हता. शुकाचे मुख पूर्वेकडे होते. त्याचा आनंद गगनात मावत नव्हता. त्या योग आसनात तो मोक्षाची तयारी करत होता. तो पंचमहाभूतांच्या नियंत्रणा बाहेर जाण्याचा प्रयत्न करत असतो. त्या अवस्थेत तो नारदांना मनाने एक प्रदक्षिणा घालतो. त्यांना सांगतो तो उच्च प्रतिच्या योगमुद्रेत गेला आहे. ह्याप्रकारे मी मोक्ष साध्य करणार आहे.

भिष्म पुढे सांगतात, त्याला नारद मोक्षासाठी प्रयत्न करण्याची परवानगी देतात. त्यानंतर तो आकाशात उडी घेतो. तेथे तो प्रथम वायू तत्त्व आत्मसात करतो. त्यामुळें तो वार्यावर तरंगत आकाशात भटकत प्रवास करू लागतो. सगळे प्राणी त्याची किमया कौतुकाने पहात असतात. तो अग्नीतत्त्व आत्मासात करतो. त्याला त्यावेळी ब्रह्माचा प्रत्यक्ष अनुभव येत असतो. तो निर्भयतेने आकाशातून फिरत असतो. सगळे प्राणी त्याचे कौतुक करत असतात. स्वर्गातील रहिवाशी त्याच्यावर सुगंधी फुलांचा वर्षाव करू लागतात. अप्सरा, गंधर्व त्याच्याकडे आश्चर्य करत पहात असतात. त्याच्या तपस्येचे फळ त्याला मिळालेले होते. शुक ते विश्व मोठ्या कौतुकाने पहात असतो. तो त्याच्यासाठी एक वेगळा अनुभव होता. तो ती तिन जग शांतपणे पण विवेकाने न्याहाळत होता. आता तो उगवणार्या सूर्याकडे एकटक पहात असतो. जसा तो पुढे जात होता त्याला सगळे आकाश भरून टाकणारा आवाज ऐकू येत होता. तेथे अप्सरा त्यांच्या मुख्या सह त्याच्या कडे डोळे फाडून पहात होत्या. त्या पंचचुडाला विचारत होत्या, ही कोणती नवीन देवता आहे? ती इतक्यावर कशी आली"? खात्रीने तो सगळ्या वासनिक बंधनांतून मुक्त झाला आहे. त्यानंतर शुक मलय पर्वताकडे सरकू लागतो. त्याचा वेग

खूप जास्त होता. तेथे उर्वशी आणि पूर्वाचित्ती रहात असतात. त्यासुद्धा शुकाला पाहून अजब करत असतात. शुकाचे योगसामर्थ्य त्या न्याहाळत असतात. त्याना समजते कीं, शुक मोठा वेदाचार्य आहे. तो लवकरच सगळे अस्मान पादाक्रांत करणार आहे. तो चंद्रासारखा होणार आहे. त्याना शुकाची चिंता वाटत होती कारण तो आता मोक्षाच्या फार जवळ गेला होता जर तो तेथे पोहोचला तर पुन्हा पृथ्वीवर येणार नव्हता. कां त्याच्या पित्याने त्याला अशा जोखमीच्या ठिकाणी जाण्याची परवानगी दिली असे प्रश्न विचारत होते. ते त्यांचे संभाषण शुकाला ऐकू येते. सगळ्या देवता त्याचे हात जोडून स्वागत करत असतात. शुक त्यांना बोलतो, "जर माझे पिता मला बोलावू लागले तर तुम्ही सगळे माझ्यावतीने त्याला एक गोष्ट सांगाल कां"? ते ऐकल्यावर त्या सगळ्या देवता एकादमात शुकाला बोलतात, "आम्ही तुझ्या आज्ञेचे पालन करू. अहो ब्राह्मणा".

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे साठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे एकसष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, शुक ज्याचे तपोश्चरण मोठे होते त्याचे चार दोष, आठ प्रकारचे तमोगुण, पाच प्रकारचे रजोगुण आणि शेवटी सत्त्वगुणाचासुद्धा त्याग करून अशा अवस्थेत पोहोचतो जेथे कोणताही गुण दोष नाही, म्हणजे ब्रह्माला मिळतो. सगळे जग त्याच्या तेजाने चमकू लागते. आकाशांत गडगडाट होऊ लागतात. सगळ्या नद्या आणि समुद्र हिंदकळू लागतात. वसवा त्याच्यावर पाऊसाच्या धारा लावतो. त्या पाण्यास सुगंध असतो. शुक त्या आकाशातून पुढे जात असतो त्याला दोन शिखरं दिसतात. एक हिमालयाचे व दुसरे मेरूचे होते. एक सोन्याचे होते. दुसरे चांदीचे होते. शुक त्यांच्यावर आदळतो. त्यांना धक्का देतो. शुकाला मात्र कांहींच होत नाही. ते पाहून सगळे स्वर्गाचे रहिवाशी जोरांने ओरडून शुकाचे कौतुक करतात. शुकाचे सगळे गंधर्व आणि ऋषी कौतुक करतात. यक्ष, राक्षस, विद्याधर असें सगळे दैवी लोक फुलांचा वर्षाव शुकावर करतात. शुक ती मर्यादा ओलांडतो. त्यानंतर तो ती स्वर्गातील नदी मंदाकिनी पहातो. तिच्या तटांवर फुलांची झाडं होती. तिच्या पाण्यात अनेक अप्सरा आंघोळ करत होत्या. शुक स्वतः नग्न होता. त्याला पाहून त्या लाजतात. जेव्हां व्यासांना समजते कीं त्यांच्या मुलाने तो मोक्षाचा योगी मार्ग पत्करून त्याप्रमाणे तो जात आहे, त्याना फार संतोष होतो. व्यास त्यांच्या योगीक शक्तीने त्या ठिकाणी जातात जेथून शुकाने त्याचा प्रवास सुरू केला होता. ते सुद्धा त्या मार्गाने जाऊ लागतात. ते नंतर पहातात ती दोन शिखरं ज्यांना शुकाने टक्कर दिली होती. व्यासांना आनंद होतो परंतु, नंतर त्याना वाईट वाटू लागते. कारण त्यांचा मुलगा आता परत मनुष्य योनीत कधीच जन्म घोणार नसतो. त्या सुमारा, शुक त्याच्या योगीक बळाने पंचमहाभूतांत विलिन होत होता. शुक त्याच्या पित्याला भो, असें एकाक्षरी संबोधन करतो. त्यावर पृथ्वीवरील सगळे चराचर भो, असे बोलून त्याला साथ देतात. त्यानंतर सगळ्या दर्या खोर्यांत, डोंगरातील गुहात तो एकाक्षरी आवाज येतो जेव्हां वारे जोरांनी वाहू लागतात. शुक निर्गूणी झाला होता. तो अतिउच्च स्थानी पोहोचला होता. व्यास त्यांच्या मुलाच्या

आठवणीत गुंग झाले होते. त्याना शोक आवरत नव्हता. अप्सरा मंदाकिनी नदीच्या किनार्यावर खेळत होत्या. त्या व्यासांना पहातात तेथे शांतपणे बसलेले. ते पाहून त्यासुद्धा कष्टी होतात. त्या नग्न होत्या म्हणून त्यातील कांहीं पाण्यात उड्या मारून स्वताला पाण्यात लपवतात. कांहीं त्यांची वस्त्रं उचलतात व नेसू लागतात. शुकाला पहातांना तशी लाज त्यांना वाटली नव्हती. कारण शुक निर्गुणी अवस्थेत गेला होता जरी तोसुद्धा नग्नच होता. जसे लहान बाळापुढे स्त्रीला शरम वाटत नाही तसे ते होते. त्याना (अप्सरांना) उलट शुकाला पाहून हर्ष झाला होता जसा बालकाला पाहून बायकांना होतो. हा फरक समजण्यासारखा होता. व्यास समजतात की, त्यांचा मुलगा सदेह मुक्त झाला आहे. ते समजल्याने त्यांना पराकोटीचा आनंद होतो. त्यावेळी महादेव त्यांचे धनुष्य पिनाक घेऊन त्यांना भेटण्यास आले, त्यांच्या बरोबर त्यांचे गण, देवता, गंधर्व असे बरेच होते. व्यासांचा शोक कमी करण्यासाठी ते त्याचे सांत्वन करू लागतात. शंकर त्याला आठवण करून देतात कीं, त्यांने पंचमहाभूतांचा मुलगा मागितला होता तो त्याला मिळाला होतो व आता तो त्या पंचमहाभूतांत गेला आहे. म्हणून दुःख करू नये. तो मुळातच वासनाहीन होता म्हणून त्यास चार आश्रमाच्या संस्काराची गरज नव्हती. म्हणून तो स्वाभाविकपणे पंचमहाभूतात एकरुप झाला आहे. आपण जसा मुलगा मागितला तसा मी दिला त्याचे त्या पंचमहाभूतात जाणे अपेक्षित होते. तुझा मुलगा त्या पंचमहाभूतात कायम रहाणार आहे. ज्या ठिकाणी तो गेला आहे तेथे कोणी देवतासुद्धा जाऊ शकणार नाहीत. तुझ्या समाधानासाठी मी शुकाची सावली तुझ्या बरोबर असेल असें करीन परतु त्याला प्रत्यक्ष तू कधीच पाहू शकणार नाहीस. त्यानंतर ते सगळे शुकाची सावली व्यांसांच्या भोवती असलेली पहातात. तेवढ्याने समाधान पावलेले व्यास तेथून निघून जातात. तुला शुकाच्या जन्माची व जाण्याची माहिती हवी होती ती सांगितली. हि कथा मला नारदानी आणि व्यासांनी वेळोवेळी सांगितली होती ती मी तुला सांगितली आहे. जे मोक्षाची अपेक्षा करतात त्याना शुकाची कथा ऐकण्याने लाभ होईल.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे बासष्ठ

युधिष्ठीर विचारतात, "मला सांगा, कोणी गृहस्थाश्रमी अथवा ब्रह्मचर्याश्रमी अथवा वानप्रस्थाश्रमी नाहीतर संन्यासाश्रमी असा कोणत्याही आश्रमातील असेल व त्याला मोक्षार्थ प्राप्त करावयाचा असेल अथवा ऐहिक जीवनात यशस्वी व्हावयाचे असेल तर त्यांने कोणती देवता पुजावी असे तुम्हाला वाटते? त्याबद्दल संहिता काय सांगते? देवता आणि पितरांच्या स्वास्थ्यासाठी कसा होम करावा ते सांगा. मोक्ष सिद्ध कोणत्या लोकांत जातो ते सांगा. स्वर्गात गेलेला खाली फेकला जातो तसे होऊ नये म्हणून काय दक्षता बाळगावयाची असते. मला सांगा, पितृंचे पितर कोण असतात? त्यांनी कोणाची प्रार्थना करावयाची असते स्वास्थ्यासाठी"?

भिष्म सांगतात, तू प्रश्न विचारण्यात चतूर आहेस. तू जे विचारत आहेस ते एका विलक्षण रहस्याशी जोडलेले आहे. केवळ तर्काने त्याचे उत्तर देता येणार नाही, त्याची उत्तर शहाणपणाने, अंदाजाने, कल्पनेने देता येत नाहीत. परंतु, नारायणाच्या वरील श्रद्धेने ती समजता येतात. तरी मी ते सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासाठी मी प्राचीन काळी झालेला नारद आणि नारायणातील संवाद तुला सांगणार आहे. तो मला माझ्या गुरूने सांगितला होता. ते कृतयुगात घडलेले आहे. त्यावेळी मनुचे मन्वंतर होते. तेव्हा नारायण धर्माच्या पोटी चार मुलांच्या रुपाने जन्म घेतला होता. ते नर, नारायण, हरी आणि स्वयंभू कृष्ण असे होते. त्यातील नारायण आणि नर हिमालयात मोठी तपस्या करत होते. त्यासाठी ते बद्री क्षेत्री त्यांच्या सोन्याच्या रथांतून गेले होते. त्यांच्या रथाला आठ चाक होती. ते रथ फार सुंदर दिसत होते. ते प्रथम अवतार ज्यांनी धर्माच्या पोटी जन्म घेतला होता ते त्यांच्या तपोश्चरणामुळें दुबळे दिसत होते. त्यांच्याकडे पाहावत नव्हते. फक्त त्या देवता ज्या त्यांच्यावर प्रसन्न होत्या त्या त्यांना पाहू शकत होत्या. नारदाला त्यांना पहावयाचे होते म्हणून तो गंधमादन पर्वतावर आला मेरु पर्वतावरून. तो त्यांना पहाण्यासाठी सगळीकडे शोधत होता. अखेरीस मोठ्या कष्टानंतर तो बद्रिकडे पोहोचतो. मोठ्या उत्सुकतेने नारद त्यांच्या पुजेच्या वेळी तेथे

येतो. तो स्वताशी पुटपुटतो, सगळ्या जगाच्या परमेश्वरासाठी जो चराचर, देवता, असुर, गंधर्व, किन्नर आणि सर्प ह्यांचा कर्ता आहे ही जागा उत्तम वाटते. धर्माच्या पोटी ते चारजण, नर, नारायण, हरी आणि कृष्ण, आले म्हणजे धर्माचे केवढे मोठे भाग्य. तेथे पूर्वी कृष्ण आणि हरी रहात होते. दुसरे दोघे नर आणि नारायण आता त्यांच्यात सामील झाले आहेत. नारदांना कुतूहल होते कीं, ते कोणती पुजा करत आहेत? ते सगळ्या सृष्टीचे पिता आहेत आणि श्रेष्ठ देवतासुद्धा आहेत. ते अशा कोणत्या मोठ्या देवतेची पुजा करत आहेत? नारदाला त्याचे कुतूहल होते. ते कोण पितृ आहेत ज्यांना हे पितर पुजणार आहेत"? त्या कुतूहलात आणि नारायणाबद्दलच्या भक्तीने प्रेरित असा नारद तेथे त्यांच्या पुढे हजर होतो. त्यांची त्यांच्या दैवताची पुजा संपल्यावर ऋषी (नारद) ते पहातात. त्या देवता ऋषीचे रिवाजाप्रमाणे स्वागत करतात. त्या मूळ देवतांचे ते आणखीन एका वेगळ्या देवतेची पुजा करण्याचे नारदाला आश्चर्य वाटत होते. नारद त्यांच्यामध्ये बसतात. त्याचे स्वागत झाले होते म्हणून ते फार खूष झाले होते. नारद नारायणाकडे एकवार पहातात व नंतर महादेवाला विचारतात, "वेदांत, पुराणात आणि अंगात व उपअंगांत तुमचे पुजन केले आहे. आपण स्वयंभू अहात, आपण सृष्टीचे कर्ते अहात, आपण विश्वाचे निर्माते अहात, आपण अमरत्व अहात, आपण सर्वश्रेष्ठ अहात, भूत, वर्तमान आणि भविष्य आपल्यात सामावलेले आहे, चार आश्रम ज्यात गृहस्थाश्रमी तुमची पुजा करत असतात. असे असतांना मला नवल वाटते कीं, ती कोणती तुमच्यापेक्षा श्रेष्ठ देवता आहे कीं, तिची तुम्ही पुजा करत अहात"? ते ऐकल्यावर भगवान बोलतात, "तो असा विषय आहे ज्याबद्दल कांहीं न बोलणे श्रेयस्कर असते. त्यामागे फार प्राचीन रहस्यमय इतिहास आहे. तुझी भक्ती खूप मोठी आहे म्हणून मी तुला ते सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. एक अतिसुक्ष्म, अनाकलनीय, अव्यक्त, ज्ञानेंद्रियांना न समजणारे, पंचमहाभूतांच्या आवाक्या बाहेरचे, जे सगळ्या जीवांच्यात असून नसलेले, ज्याला क्षेत्रज्ञ असें संबोधन प्राचीन ऋषींनी दिले आहे, जे अध्यात्मिक उर्जेत अमर्याद आहे, म्हणून सत्त्व, रज आणि तम गुणांनी त्याची मोजदाद होत नाही, त्याला पुरूष असें कांहीं सांगतात, ज्याच्यामधून अव्यक्त उत्पन्न झाले आहे, ती स्वतः अव्यक्त असली तरी व्यक्त सृष्टी तिच्यातून आली आहे. तिला

अविनाशी प्रकृती (माया) असें म्हणतात. तिच्यामुळें सगळे घडत असते, उत्पत्ती आणि विनाश तिच्या गुणात आहेत. तिच्या प्रेरणेने आम्ही उत्पन्न झालो आहोत. त्या आत्म्याची आम्ही पुजा करत होतो. तिच्यावर कोणी आणखीन उच्च शक्ती नाही. त्या आत्म्याची आम्ही पुजा करत होतो. त्या आत्म्याच्या आदेशानुसार आम्ही सगळ्या गोष्टी करत असतो. आम्हाला त्या सगळ्या देवतांची आराधना करावी लागते जे शास्त्रात सांगितले आहे. त्यात स्थानू, पितर, ब्रह्म, मनु, दक्ष, भृगू, धर्म, यम, मरिची, अंगिरस, अत्री, पुलस्त्य, पुलह, क्रातू, वसिष्ठ, परमेष्थी, विवश्वात, शोम, त्याशिवाय करद्दम, क्रोध, अवक आणि कृत आणि त्याशिवाय प्रजापती, असे सगळे प्रथम जन्मलेल्यात येतात. ते सगळे विधात्याच्या नियमांचे पालन करत असतात. स्वर्गातील देवतासुद्धा विधात्याची पुजा करत असतात तेव्हां त्यांना जे पाहिजे ते मिळते. हा अभेद्य नियम आहे. जे सतरा गुणांतून मुक्त आहेत ते त्यात येतात. ते सतरा गुण आहेत, पांच ज्ञानेंद्रिय, पांच कर्मेंद्रिय, पांच प्राण, मन आणि बुद्धी. ज्यांनी पंधरा गुणांचा त्याग केला आहे ते जीवनमुक्त होतात. जेव्हां तो मोक्ष साध्य करण्यास निघतो त्याला क्षेत्रज्ञ म्हणतात. अशा आत्म्यास संहितेत सांगतात त्याप्रमाणे व्यक्त आणि अव्यक्त असे दोनही समजले जाते. तो गुणहीन असतो त्यावेळी गुणपूर्ण सुद्धा असतो हे सापेक्ष असते परिस्थितीनुसार. आम्ही त्या आत्म्यातून आलो आहोत. त्याला आम्ही तसेच जाणतो. सगळे त्याचीच प्रार्थना करत असतात. त्याचीच भक्ती करावयाची असते. म्हणून सोहम् साधना म्हणजे स्वताची साधना हींच सर्वश्रेष्ठ असते. कोणत्याही इतर देवतेच्या पुजनाने मोक्ष प्राप्त होत नाही. त्या पुजा, तशा भक्ती सकाम प्रकारच्या असतात. मोक्षाच्या साधनेला निष्काम म्हणतात. असा त्यांचा संवाद झाला तो मी तुला सांगितला. भिष्म बोलतात.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे बासष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकशे त्रेसष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, नारायणाचे ते निवेदन ऐकल्यावर नारद त्याला बोलतात, "धर्माच्या पोटी ज्या उद्देशाने तुम्ही जन्म घेतले आहेत तो उद्देश सफल हो. आता मी तेथे जाणार आहे. तेथे तुमचे खरे रुप मी पाहू शकेन. मी नेहमी नाराणाची पुजा करत असतो. मी त्यात कधी भेद केलेला नाही. मी वेदांचा अभ्यास केला आहे. मी कधी खोटे बोलत नाही व कोणाचे रहस्य दुसर्यांना सांगत नाही. म्हणून मी सात्त्विक आहे. मी घोर तपस्या केली आहे. संहितेत दिल्याप्रमाणे मी चारही आश्रमांचे संरक्षण केले आहे. मी मित्र आणि शत्रू असा भेदभाव कधी केला नाही. मी केवळ आणि केवळ नारायणाची भक्ती करत असतो. त्याला मी विधात्याच्या जागी पहातो. एवढे सगळे उत्तम गुण माझ्यात असल्याने मला त्या अंतिम देवतेचे दर्शन कां होणार नाही"? परमेश्थीच्या मुलाचे ते बोलणे ऐकून नारायण त्याला जाण्याची मुभा देतो. तेव्हां त्याला सांगतो, "अरे नारदा, तू जा पण लक्षात असू दे कीं, त्याच्या पुजनाचे मंत्र तूंच लिहीले आहेस. ते ऐकल्यावर नारद यथोचित सन्मान नारायणाचा करतो. तो निघतो त्या शुभ्र बेटाकडे जेथे ती देवता असते. योगसामर्थ्याने तो आकाशात उडत उत्तर पश्चिमेकडे जाऊ लागतो जेथे ते शुभ्र बेट आहे. मेरू पर्वतावर गेल्यावर तेथे थोडी विश्रांती घेतो. तो त्या उत्तर पश्चिमेकडे एक नजर टाकतो. तेथे त्याला दुधासारखा शुभ्र सागर दिसतो. त्यात ते शुभ्र बेट असते. ते बेट साधारणपणे तेवीस हजार योजने दूर होते. ज्या बेटावर शुभ्र कातडीचे लोक रहात होते. त्यांच्या डोळ्यांना पापण्या नव्हत्या. ते पूर्णतया निष्पाप असतात, कोणी पापी त्यांच्याकडे पाहतो तर त्याचे डोळे फुटतात, त्यांची त्वचा आणि हाडं कठीण असतं, त्याना मान सन्मान व अपमान समजत नव्हते. त्याच्या कडे पाहता समजत असें कीं ते दैवी प्रकारचे आहेत. त्यांच्या अंगावर शुभ लक्षणं दिसत होती. त्यांचा आवाज घोघरा असे. त्यांच्या पायावर शेकडो रेषा असतं, त्याना साठ दांत असतं, त्याशिवाय आठ लहान दात असतं. त्यांना अनेक जिभा होत्या. असं वाटत होते कीं, ते कोणालाही खाऊन टाकतील. त्यांना ज्ञानेंद्रिय नव्हती. म्हणून ते मनुष्य नव्हते.

युधिष्ठीर विचारतो, अहो पितामहा, तुम्ही सांगता कीं, त्या प्राण्याला ज्ञानेंद्रिय नव्हती, ते त्याच्या जगण्यासाठी कांहीं खात नव्हते, त्यांच्या डोळ्यांना पापण्या नव्हत्या. त्यांच्या अंगातून सुगंध येत होता, मला सांगा, ते कोण होते व कसे जन्मले होते. ते प्रवृत्तीचे प्रतिक समजले जात होते असं तुम्ही सांगता. मला त्यांच्या बद्दल फार कुतूहल वाटत आहे. त्यांना राग, लोभ असे विकार होते कां"? तुम्ही मला ते सांगा. तुम्ही सगळे जाणता.
भिष्म पुढे सांगत असतात, "खरे सांगावयाचे म्हणजे ती सगळी फार मोठी गोष्ट आहे जी मला माझ्या शिक्षकानी सांगितली होती. त्याचा सारांश मी तुला सांगणार आहे. त्याचे असे झाले फार प्राचीन काळी कृत युगाच्या जमान्यात एक वसू नांवांचा राजा ज्याचे विशेषण उपरीचर होते कारण त्याचा रथ आकाशातून उडत असे, तो राज्य करत होता. तो इंद्राचा मित्र होता. तो नारायणाची पुजा करत असें. तो संहितेत दिलेल्या सगळ्या नियमांचे पालन करत असे. तो फार कार्य तत्पर होता. नारायणाच्या कृपेमुळें तो सार्वभौम राजा झाला होता. तो आकाशातून जात असे. नारायणाची पुजा झाल्यावर तो ब्रह्माची पुजा करत असे. त्यानंतर तो ब्राह्मणांची पुजा करत असे. त्यानंतर जे उरलं ते तो चांगल्या अभिजनांत वाटून देत असे. ते झाल्यावर तो स्वतः भोजन करत असे. तो चांगुलपणाचे (माणूसकी, भूतदया) नियम पाळत असे. तो जनार्दनाची पुजा करत असे, जो सृष्टीचा जनक आहे. त्याच्या भक्तीवर संतुष्ट झालेले भगवान त्याला त्यांच्या गादीवर त्यांच्या बरोबर बसण्यास सांगत असतं. तो असे समजत असें कीं जे कांहीं त्याच्याकडे आहे ते सगळे नारायणाचे आहे. तो सत्तवत विधी (हा विधी नारदाने सांगितला) करत असे यज्ञ करताना. उपरिचर वसू राजा त्याचे सगळे यज्ञ एकचित्ताने करत असे, त्याच्या वाड्यात ब्राह्मणाचे येणेजाणे असें. ते पंचरत्र विधी (हा विधी नारदाने सांगितला) करत असत. नारायणाला प्रसाद चढवल्यानंतरच तो खात असे. जोवर तो राज्य करत होता पाप कोणी करत नव्हते.
एकदा ते सात ऋषी मरिची, अत्री, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, क्रातू, वसिष्ठ, ज्यांचा उल्लेख चित्रशिखंडी म्हणून होत असे, त्या मेरूच्या शिखरावर जमा झाले होते. तेथून त्यांनी एक फतवा जाहिर केला. त्यात वेदाच्या नियमांचे पालन कसे करावे ते

सांगितले होते. त्याप्रमाणे माणसाच्या विविध कर्तव्यांचे बाबत सविस्तरपणे दिले होते. एकाप्रकारे ती नवीन संहिता होती. ते सात ऋषी प्रकृतीच्या सात अंगांचे प्रतिक होते. ते तो फतवा काढत होते हे महत्वाचे होते. ते सत्याचे संरक्षक होते. त्यामध्ये नितीशास्त्र, अध्यात्मविद्या आणि आगम शस्त्रांचे (कर्मकांड) विवेचन होते. सत्य, हित आणि सुखाचे (अर्थ, काम आणि मोक्ष) बद्दलचे ते कसे साध्य करावयाचे त्याचे विवेचन होते. नारायणाची पुजा केल्यानंतर त्याना ते सरस्वती देवीने सांगितले होते. म्हणून त्याच्या अधिकृतपणाबद्दल कोणी शंका घेऊ नये असा युक्तीवाद मांडला जात होता. त्यात एक लक्ष कवनं होती. नारायण सांगतात की, त्यातून प्रवृत्ती आणि निवृत्ती वरील संपूर्ण विवेचन होते जे वेदातील ऋचा, साम, यजू आणि अथर्व ह्यात होते. त्या फतव्या प्रमाणे नारायणाने उत्तम गुणांतून ब्राह्मण तयार केले, क्रोधातून रुद्र तयार झाले आहेत. त्या फतव्या प्रमाणे सगळ्या जीवांना जगण्याचा हक्क आहे. त्यात महत, अहंकर ह्यांचे विवेचन होते. नारायण त्यांना आशिर्वाद देतात कीं, तो फतवा सगळे मान्य करतील. मनू, उशनास, बृहस्पति असें सगळे संहिता तयार करणारे त्याला मान्यता देतील. त्यानंतर तो फतवा राजा उपरिचर स्वीकारतो. त्यालाच वसू असे सुद्धा सांगतात कारण त्याची नऊ मुलं पुढे वसू म्हणून देवतांत बसत आहेत. त्या नियमानुसार राजे राज्य करतील असे नारायण सांगतात. परंतु, राजा उपरीचराच्या मृत्यूनंतर तो फतवा विसरला जाईल. ते बोलल्यानंतर नारायण अज्ञात ठिकाणी निघून जातात. कालांतराने तो फतवा निराळ्या पद्धतीने अमलात आणला जात आहे. त्यातून उपनिषद तयार झाली असे समजले जाते. त्याशिवाय वेदाच्या अनेक शाखा तयार झाल्या. त्यानंतर ते ऋषी तपस्या करण्यासाठी निघू गेले.

मोक्ष धर्म पर्व एकशे त्रेसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे चौसष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, शेवटच्या कल्पाच्या अखेरीस जेव्हां दैवी पुरोहीत बृहस्पति अंगिरसाच्या घराण्यात जन्मला होता. सगळ्या देवता हर्ष करत होत्या. त्याकाळात बृहद्ब्रह्म आणि महत ह्यांचा अर्थ एकच होता. दैवी पुरोहित त्या नांवाने बोलला जात होता कारण त्याच्यामध्ये तसे गुण होते. राजा उपरिचर ज्याला वसू म्हणून सुद्धा ओळखतात, बृहस्पतिचा शिष्य झाला. त्यानंतर तो त्याच्या गुरूकडून सातऋषींनी तयार केलेली संहिता शिकू लागला. त्या सातांना चित्रशिखंडी म्हणून ओळखले जात होते. त्यानंतर राजा सगळ्या पृथ्वीवर राज्य करू लागला जसा इंद्र स्वर्गावर राज्य करत होता. राजा अश्वमेध यज्ञ करतो. त्यावेळी ब्रह्म स्वतः त्यांच्या यज्ञाचे होत्री झाले होते. एकत, द्वित आणि त्रित हे तिघे सदस्य (यज्ञाच्या कामाचे निरीक्षण करून त्यात कांहीं दोष होत नाही हे पहाण्यासाठी जे निरीक्षक असतं त्यांना सदस्य म्हणतात) होते. त्याशिवाय धनुष, रैव, अर्ववसू, पर्ववसू, ऋषी मेधातिथी, ऋषी तंड्य, ऋषी शांती ज्याना वेदशिरस म्हणतात असे सदस्यासिन होते. सदस्यासिन सदस्यांना मदत करण्यासाठी असतात. ऋषी कपिल जे आधीच्या कल्पात सलिहोत्र होते, तित्री जे वैशंपायनांचे ज्येष्ठ बंधू होते. कण्व, देवहोत्री असे एकंदर साठ त्या यज्ञात सहभागी होते. त्या यज्ञात पशू वध झाला नाही. ब्रह्म सिद्धीसाठी जे यज्ञ केले जात त्यात पशूवध सांगितलेले नाहीत परंतु, इतर गौण देवतांना प्रसन्न करण्यासाठी आणि पार्वतीसाठी जे यज्ञ होत त्यात पशू वध प्रमाण होते. प्राचीन देव हरी त्या यज्ञाने राजावर प्रसन्न झाला होता. तो इतरांना न दिसणारा फक्त यज्ञ करणार्यांना दिसत होता. त्या देवाला दिलेला प्रसाद तो अदृष्यपणे स्वीकारत होता. ते पाहून बृहस्पति रागावले. तो त्याच्या हातातील तूप होमात सोडण्याची पळी आकाशात फेकतो. त्याला क्रोधाने अश्रू येतात. राजा उपरिचराला तो बोलतो, हा प्रसाद मी नारायणाला दिला होता तो कोण खाऊन गेला? मला न दिसता तो कसा त्यांने ग्रहण केला? युधिष्ठीर विचारतात, "त्या मोठ्या यज्ञात सगळ्या देवता त्यांच्या रुपात प्रसाद ग्रहण करण्यासाठी आल्या होत्या आणि त्यांचे

दर्शन होत होते, मग आदिदेव हरी कां तसे आले नाहीत"? भिष्म सांगतात, जसा बृहस्पति रागावला त्याला शांत करण्यासाठी राजा स्वतः आणि सदस्य आणि इतर त्याला शांत करण्याचा प्रयत्न करतात. ते त्याला बोलतात ह्या कृतयुगात असें रागावणे श्रेयस्कर नाही. ते तुम्हाला शोभत नाही. तो प्रसाद आपणच अर्पण केला होता तसेंच ती देवता कोणालाही दिसत नसते हे आपण जाणता. फक्त तेंच त्याला पाहू शकतात ज्यांच्यावर त्याची कृपा आहे. हा नियम आहे. त्यानंतर एकता, द्विता आणि त्रिता सदस्य, इतक ऋषी सांगू लागले, "आपण ब्रह्माची मुल आहोत. त्याच्या इच्छेतून उत्पन्न झालो आहोत. एकदा आमचे इप्सित साध्य करण्यासाठी आम्ही उत्तरेकडे गेलो होतो. तेथे हजारो वर्षे तपस्या करत होतो, त्यानंतर मोठी अध्यात्मिक सिद्धी आम्ही प्राप्त केली होती. त्यानंतर पुन्हा उभे राहून तपस्या करत होतो. ते मेरू पर्वताच्या उत्तरेकडे होत होते. पांढर्या सागराच्या किनारी ते झाले. आमचा इरादा एकच होता कीं नारायणाचे दर्शन व्हावे, परंतु, त्यांची कृपा झाली नाही आणि आम्हाला ते दिसले नाहीत. त्या उपासनेच्या समारोहाच्या वेळी आम्ही अखेरचे तर्पण केले तेव्हां आम्हाला एक आवाज ऐकू आला. तो आवाज बोलला, "अहो ब्राह्मणानो, तुमचे तपोश्चरण चांगले झाले, तुमची इच्छा नारायणाचे दर्शन घ्यावयाची आहे. त्यासाठी तुम्ही उत्तरेकडे असलेल्या सफेद सागराकडे जा. तेथे एक सफेद बेट आहे. तेथे रहाणारे लोक सफेद त्वचेचे असतात. ते नारायणाचे भक्त आहेत. त्याना वासना नसतात. ते कांहीं खात नाहीत, त्यांचे डोळे पापण्या शिवाय असतात, त्यांच्या अंगाला एकप्रकारचा सुगंध असतो. ते त्या एकाच देवाची प्रार्थना करत असतात. तेथे जा, तेथे मी तुम्हाला दिसेन. तो आवाज ऐकल्यावर आम्ही सगळे त्या शुभ्र सागराकडे निघालो. आम्ही त्या सफेद बेटात गेलो. तेथे आम्हाला कांहींच दिसत नव्हते. तेथे त्या देवाचे तेज सगळीकडे पसरलेले होते त्यामुळें त्या तेजाने आमचे डोळे दिपून गेले होते. आम्हीं कांहींच पाहू शकलो नाही. कदाचित आपली साधना पुरेशी नाही असें समजून आम्ही पुन्हा तपस्या करण्याचे ठरवले. तशी शंभर वर्षे गेली. तपस्या पूर्ण झाल्यावर तेथे आम्ही शुभ्र रंगाचे शुभलक्षणं असलेले लोक पाहू शकलो. कांहींचे चेहरे उत्तरेकडे व कांहींचे पूर्वेकडे होते. ते सतत ब्रह्माच्या प्रार्थनेत गुंतलेले असे दिसत होते. ते जपयज्ञ करत असावेत. तशा

जपयज्ञात, यज्ञ कुंड असते आपले शरीर. त्या अग्नीला श्वासाने अर्घ्य दिले जाते. त्याबरोबर नारायणाचा जप केला जातो. त्यात आपल्या इच्छा, वासना ह्यांची आहूति द्यावयाची असते. ते लोक तसा जपयज्ञ करत होते. त्याला स्थान, वेळ ह्यांचे (मुहूर्त) गरज नसते. जपयज्ञ सर्वोच्च श्रेणीचा यज्ञ समजला जातो. नारायणाला आणि शंभूला जपयज्ञ अतिशय प्रिय असतो. त्यांचे तेज अंतकाळी सूर्याचे होते तसे प्रखर होते. तेथील सगळे समान शक्तीचे होते. तेथे कोणी उच्च नीच नव्हते. अचानकपणे एका ठिकाणी प्रखर तेज दिसू लागले तेव्हां ते त्या दिशेने धावू लागले. ते हात जोडून कोणाची तरी वाट पहात उभे होते. ते नारायणाला अर्घ्य देत होते जपयज्ञाप्रमाणे. आम्ही सगळे आमची शुद्ध हरपून गेलो होतो. त्या बेटावरील लोक जपयज्ञ करत होते. त्याचा उल्लेख हृषिकेश म्हणून ते करत होते. ते कांहीं सुगंधी फुलं आणि पान त्याला अर्पण करत होते. जो तो त्याची पुजा करत होता. तो पंचरात्र विधी होता जो येथे नारदानी आणला होता. नारायणाची भक्ती मनाने, कर्माने व इच्छेने (शरीराने) करावयाची असते. ते होत असतांना हरीचे दर्शन झाले. तो सोहळा संपल्यावर आम्हाला बेचैनी होऊ लागली. तेथील कोणीही आमची साधी दखल सुद्धा घेतली नव्हती. जणू आम्ही तेथे नव्हतो. त्यावेळी कोणी आकाशवाणी केली त्यात ती आम्हाला सांगत होती, ते सफेद लोक नारायणाच्या भक्तीत रमलेले आहेत म्हणून ते तुमच्या कडे लक्ष देत नाहीत. तुम्ही जेथून आलात तेथे निघून जा. असें सांगून ते ऋषी पुरोहिताला यज्ञ पुढे पूर्ण करण्याचे सांगतात. नारायण त्यावेळी सांगतात, "आता कृतयुग संपणार आहे त्यानंतर त्रेता येईल त्या आधी मोठा वाईट काळ येणार आहे, जेव्हां विवस्वात चक्र असेल. पुढे ते ऋषी पुरोहिताला सांगतात इतकी घोर तपस्या करूनही आम्हाला त्याचे दर्शन होत नाही म्हणून त्याबद्दल खेद करू नकोस. स्वाभाविकपणे तो अव्यक्त असतो म्हणून त्याचे व्यक्त दर्शन होत नाही. ते ऐकल्यावर पुरोहिताचे सांत्वन झाले व तो यज्ञ पूर्ण करण्याचे काम घेतो. उपरिचर त्या यज्ञानंतर त्याचा राजकारभार करत असतो. त्यानंतर तो स्वर्गात जातो. कांहीं काळांनी एका ब्राह्मणाच्या शापामुळे तो खाली पृथ्वीवर फेकला जातो. तो खर्या राजधर्माचे पालन करत असे. त्याची नारायण भक्ती (जपयज्ञ) चालूच होती. त्यामुळें तो पुन्हा वर आला.

नारायणाच्या कृपेने तो परत स्वर्गात गेला. नारायणाच्या कृपेने तो ब्रह्माच्या योग्यतेला पोहोचला होता.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे चौसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे पासष्ठावा

युधिष्ठीर विचारतात, "मला समजत नाही जर तो राजा वसू नारायणाचा मोठा भक्त होता तर तो स्वर्गातून खाली कां फेकला गेला आणि तेसुद्धा मातीत खाली, असे कां झाले"? भिष्म सांगतात, ते समजण्यासाठी तुला एक जुनी कहाणी सांगावी लागेल. त्यामध्ये ऋषी आणि देव ह्यांचा संवाद आहे. देव ब्राह्मणांना सांगतात कीं, यज्ञ करतांना घोड्याचाच बळी चढवला पाहिजे. ब्राह्मण सांगतात कीं, प्राचीन श्रृती सांगते कीं, धान्याचा बळी द्यावयाचा त्यानासुद्धा तेंच नांव आहे. ऋषी बोलतात, कृतयुगात प्राण्यांचा वध करणे कसे योग्य होईल? कांहीं मिळवण्यासाठी प्राणी मारणे कसे श्रेयस्कर ठरेल"? ते भूतदयेच्या नियमात बसत नाही. अशारितीने त्यांचे बोलणे होत असतांना, राजा वसू त्याच्या सैन्यासह तेथून जात होता. त्याला आकाशातून येतांना पहाताच ते ब्राह्मण देवांना बोलतात कीं, हा राजा आपल्याला योग्य मार्गदर्शन करण्यास योग्य आहे. हा राजा यज्ञ करणारा आहे व मोकळ्या मनाने दानं करत असतो. तो नेहमी सगळ्यांचे चांगले करत असतो. तो सगळ्या प्राण्यांचे सुद्धा भले करत असतो. असे ठरल्यानंतर ते देव आणि ऋषी राजा वसूला भेटतात. त्याला त्यांची समस्या सांगतात. ते विचारतात कीं, यज्ञात बळी कोणता योग्य असेल, घोड्याचा कां धान्याचा ते सांगा. आम्हाला काय प्रमाण आहे ते सांगा. आम्ही आपल्याला निवाडा करण्याची विनंति करतो. ते ऐकल्यावर वसू त्याचे हात जोडून बोलतो ब्राह्मणांना, "मला सांगा तुम्ही ब्राह्मण काय समजता योग्य आहे"? ऋषी सांगतात कीं, त्याच्या मते धान्याचा बळी दिला पाहिजे. तेव्हां देव सांगतात कीं, प्राणीच बळी दिला पाहिजे. ते राजाला सांगतात कीं, त्याने त्याचे मत सांगावे ह्या बाबतचे.

भिष्म पुढे सांगतात, वसू त्याचे मत सांगतो कीं, यज्ञात प्राण्याचाच बळी श्रेयस्कर असतो. ते ऐकल्यावर ब्राह्मण संतापतात व राजाला शाप देतात कीं, तो आत्ताच्या आत्ता जमिनीत असलेल्या बिळांत जाऊन पडेल व त्याचे आकाशातून उडणे बंद होईल. त्याबरोबर राजा वसू त्याच्या रथातून खाली असलेल्या खोल बिळात जाऊन पडतो.

नारायणाच्या कृपेमुळें राजा वसू नारायणाचे नांव विसरत नाही. तो त्या स्थितीत त्याच्या नांवाचा जपयज्ञ करत असतो. त्याचवेळी सगळ्या देवता राजाने त्यांच्या बाजूने कौल दिला म्हणून त्यास मदत करण्याचे ठरवतात. ते त्यांच्या दैवी शक्तीच्या मदतीने राजाला त्या बिळात सुरक्षित करतात. त्या देवता सांगतात कीं, त्या शापातून नारायण त्याची मुक्तता करतील. त्यांची कृपा तुमच्यावर आहे. नंतर ते नारायणाला जाऊन सांगतात काय व कसे झाले. नारायण त्याच्या गरूडाला राजाला सोडवून आणण्यासाठी पाठवतो. गरुड ते बिळ शोधत फिरत असतो. ते मिळावयाला अवधी लागतो. त्या आधी त्याला साजूक तुपाची धार पिण्यास ते देव देतात त्याला वसूधारा असें म्हणतात. देव राजाला वर देतात कीं, नारायण त्याला शोधून काढतील व त्या शापातून मुक्त करतील. गरूड त्या बिळात जातो आणि राजा वसूला बाहेर काढतो. नारायण वसूला त्या शापातून मुक्त करतात आणि स्वर्गात नेतात. वसू नारायणाने दिलेले मंत्र उच्चारत नारायणाची आराधना करत असतो. त्याप्रमाणे दिवसातून पांच वेळा तो ते मंत्र बोलत असें. ब्राह्मणांचा शाप ब्रह्माने कार्यरत केल्याने ते शांत झाले आहेत. क्रोधाने ते शाप देत असल्याने त्यांची अध्यात्मिक उर्जा कमी झाली आहे. त्यामुळे ते आता देवांना त्रास देऊ शकणार नाहीत. आणि यज्ञात देवांना जसा प्राण्याचा बळी पाहिजे तसा मिळत रहाणार आहे. आता वसूला त्याचे स्थान द्यावयाचे आहे. त्यानंतर तो राजा पुन्हा पूर्ववत त्याच्या रथाने आकाशातून उडत जाऊ लागला.

भिष्म पुढे सांगतात, "मी तुला ते सगळे सांगितले ज्या कारणाने राजा वसू मातीतील बिळात कां फेकला गेला. आता सांगतो नारद त्या शुभ्र बेटावर कसे गेले व काय केले.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे पासष्ठ संपला.

## मोक्ष धर्म पर्व

## भाग एकशे सहासष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, नारद त्या प्रशस्त शुभ्र बेटात (आईस लँड) येतात. तेथे त्याना ते शुभ्र लोक दिसतीत. ते एकमेकांना वाकून अभिवादन करतात. नारायणाला सदेह पहाण्याच्या इच्छेने नारद तेथे राहून लागतात. ते सुद्धा जपयज्ञ करू लागतात. नारद त्या शित बेटात दोनही हात वर करून उभे राहून नारायणाची मनोभावे आराधना करत असतात. ते कवन गातात नारायणाच्या कौतुकाची. ते त्याचे कौतुक असे करतात कीं, तो एकाच वेळी निर्गुणी आणि सगुणी असतो. अशा तुला माझा नमस्कार असो. तू क्षेत्रज्ञ आहेस. तू प्रशमेश आहेस, तूच पुरूष आहेस, तूझ्यातून सत्त्व, रज आणि तमोगुण आले आहेत. तूंच अमृत आहेस, तूंच विचार सागर आहेस, तूंच अनंत नाग आहेस, तूंच आकाश आहेस, तूंच पंचमहाभूत आहेस, तूंच व्यक्त आणि अव्यक्त असे दोनही एकाच वेळी असतोस, तूं आहेस आणि त्याच वेळी नाहीस सुद्धा. तू प्रथम देव आहेस, तूंच देणारा आणि घेणारा आहेस. तू करणी आणि अकरणी आहेस. तूंच अश्वत्थ आहेस. तूच वाणी आहेस, तूंच श्वास आहेस. तूंच सृष्टीचा तारण करता आणि मारण करता आहेस. तूंच वेद दिलेस, तूंच यज्ञ आहेस, तूंच ब्रह्म आहेस ज्याच्यासाठी यज्ञ करतात, सगळ्या देवता तुझ्यातून येतात. यज्ञात जी सात दानं केली जातात ती तुझ्या नावांने होत असतात. तुझ्यासाठी गायत्री मंत्र ब्राह्मण गात असतात. तूंच यम, तूंच चित्रगुप्त, तूंच यमी आहेस. तुषीका तूंच आणि महातुशीता तूंच आहेस. तूंच मृत्यू आणि तूंच जन्मदाता आहेस. तूंच यज्ञातील आहुत्या आहेस. तूंच अग्नी आहेस, तूंच संमिधा आहेस, तूंच मंत्र आहेस. तूंच का आहेस. तूंच विश्वाचे मन आहेस, तूंच परमहंस आहेस, तूंच आहेस सांख्य आणि तूंच आहेस योग. तूंच आत्मा, तूंच परमात्मा, तूंच वेद, तूंच वशट आहेस, तूंच ॐ, तूंच स्वाहा, तूंच तपस्या, तूंच दिशा, तूंच मार्ग (मोक्ष मार्ग), तूंच अथर्वशिर्ष, तूंच वालखिल्य (महायोगी) आहेस, तू व्यक्त आणि अव्यक्त आहेस, तूंच वासुदेव, तू यज्ञाचा मोठा

हिस्सा घेणारा आहेस, तूंच आशिर्वाद देणार, तू आनंद, तूं दुःख, तूं समाधान, तू हरी, तू इंद्रीयसंयम, तू चांगुलपणा, तूंच माणूसकी, तूंच भूतदया, तूंच शांति, तूंच कर्म, तूंच (कर्म) फळ, तूंच अक्षर, तूंच नश्वर, तूंच मोक्ष, तूंच निवृत्ती, तूंच प्रवृत्ती, तूंच प्रकृती, तूंच भोग, तूंच विलास, तूंच कारण, तूंच परिणाम, तूंच चित्रशिखंडी, तूंच वारदाई, तूंच अपरंपार, तूंच ब्रह्म, तूंच मित्र, तूंच सखा, तूंच आधार, तूंच क्षमा, अशा तुला माझा नमस्कार असो. मला तुझे अरे हरी देवा, सदेह दर्शन करावयाचे आहे. तरी कृपा कर आणि मला दर्शन दे. असे नारद सांगत होते नारायणाला.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सहासष्ठावा संपल.

# मोक्ष धर्म पर्व

# भाग एकशे सदुसष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, अशारितीने नारद नारायणाची आळवणी करतात त्याच्या अनेक गुणांचा, रुपांचा आणि कर्तृत्वांचा उल्लेख करून. त्यामुळे आनंदी झालेले नारायण त्याला सदेह दर्शन देतात. त्या रुपात तो जगदिश्वर चंद्रा पेक्षा जास्त शीतल भासत होता. त्याचे रुप विश्तीसारखे होते. त्या रुपात नारायण अनेक छटांनी चमकत होते. कधी पोपटाचा हिरवा रंग तर कधी स्पटीकासारखा चमकणारा तर कधी काळसर तर कधी सोन्यासारखा तर कधी पूर्ण शुभ्र तर कधी निलमण्यासारखा तर कधी पांचू सारखा असे सतत त्या रुपाचे रंग आणि इतर स्वरुप बदलत होते. त्या रुप बदलण्याचे वैविध्य अवर्णनीय होते. ते एक विलक्षण सुंदर आणि विलोभनीय दृष्य होते. त्याला हजार नेत्र होते. त्याला हजार डोकी होती, तसेच हजार पाय, हात होते. त्याचे ते रुप कोणाच्या कल्पनेच्या पलिकडले होते. त्याच्या एका मुखातून ओमकार येत होता. त्यानंतर गायत्री ऐकू येत होती. ते व्यक्त नव्हते कारण ते नारदाला त्याच्या मनात ऐकू येत होते. दुसरे कोणी ते रुप पाहू शकत नव्हते आणि ऐकू शकत नव्हते. त्याची इतर मुख वेदांचे मंत्र उच्चारत होती. ते सगळे परा वाणीत होते. अरण्यकातील अनेक मंत्र त्याच्या असंख्य मुखातून येत होते. त्या सदेह रुपाच्या हातात कमंडलू होते आणि इतर कांहीं हातात यज्ञाची वेदी होती. प्रत्येक हातात कांहीं वेगळे धरलेले दिसत होते त्यात कुस गवताची पाती, हरणाचे कातडे, चंदनाची उटी, अग्नी अशी विविध सामुग्री जी यज्ञ आणि इतर पुजा विधींत वापरली जातात ती सगळी होती. ते अद्भूत दृष्य पाहून नारद नम्र झालेले त्याला लवून नमन करतात. नारद असें वाकलेले असतांना तो देवादिदेव त्याला सांगतो, "अरे पुण्यवंता, ह्या आधी ऋषी एकता, द्विता आणि त्रिता असेंच आले होते माझे दर्शन घेण्यासाठी. परंतु, त्यांना माझे दर्शन झाले नाही. तू जे पहात आहेस ते माझ्या असंख्य अवतारातील देहांचे दर्शन आहे. सगळे एकत्र तू पहात आहेस. ते वेगवेगळे पहाणे ह्या युगात शक्य होणार नाही इतके ते अवतार आहेत. हल्ली माझ्या चार रुपात मी धर्माच्या घरी जन्मलो आहे. तू आता काय वर मागूं इच्छितोस तो

मांग. तू जे पहात आहेस ते माझे अक्षर रुप आहे जे नित्य आहे. त्यात बदल होत नाहीत".

नारद ते ऐकल्यावर त्या ईश्वराला बोलतात, "अहो पवित्र देवा, मला आज तुझे दर्शन झाले त्यांने मी धन्य झालो आहे. माझी तपस्या फळाला आली असं मी समजतो. तुझे दर्शन हाच मोठा दूवा मला प्राप्त झाला आहे. अहो चिरंतन सत्य अशा तुला माझा प्रणाम असो.

भिष्म पुढे सांगतात, त्यानंतर तो महादेव नारदाला बोलतो, "आता तू जा, अरे नारदा, हे लोक जे तू पहात आहेस ते माझे परम भक्त आहेत. त्यांच्या भक्तीची तुलना कोणाच्याही भक्तीशी करता येणार नाही. ते रजो आणि तमोगुणाच्या पलिकडे गेलेले आहेत. त्यांचे वैराग्य अतुलनीय आहे. ते पूर्ण निवृत्त अवस्थेत असतात. त्यांचे सगळे ध्यान फक्त माझ्यावर असते. म्हणून मी त्यांच्यात नेहमी रहातो. फार प्राचीन काळी ते माझ्यात गुंतले ते तसेंच राहिले आहेत. ते त्यामुळें नित्यानंदात असतात. अरे नारदा, आता मी सांगतो माझ्या अनाकलनीय रुपाबद्दल जे एरवी समजणे सोपे नसते. मी ह्या विश्वाचा आत्मा आहे. जो नित्य आहे आणि कधीही नष्ट न होणारा आहे. मी धारण केलेले शरीर जरी क्षर असले तरी मी मात्र अक्षर असतो. सगळी पंचमहाभूत माझ्यातून आली आहेत. मी मुळांत निर्गुण आहे. तरी प्रकृतीच्या प्रभावात मी गुण धारण करत असतो. मी स्वभावतः अव्यक्त असलो तरी प्रकृतीच्या प्रभावामुळे मी व्यक्त होत असतो. सांख्यांच्या गणती प्रमाणे प्रकृतीचे पंचवीस गुण आहेत त्याच्या पलिकडला असा मी सव्विसावा आहे. मला पुरूष म्हणतात. जो मी ऐहिक दृष्ट्या निष्क्रिय असतो. मला समजण्यासाठी कल्पनांची गरज असते कारण मी फक्त अनुभवाने समजला जात असतो. जे मला समजतात ते मोक्षाकडे जाऊ शकतात. मला तर्काने समजणे अशक्य असते. मला अनेक नांवं आहेत माझ्या चाहत्यानी दिलेली, त्यातील कांहीं ज्यात वासुदेव हे जास्त प्रचारात आहे. मी सगळ्या चराचरांच्या देहात असतो. म्हणून ते सजीव असतात. माझ्यामुळें त्या देहातील चैतन्यमय क्रिया होत असतात. त्याकरता जी कार्यकारी प्रेरणा आहे ज्यात माझी अध्यात्मिक उर्जा वापरली जाते. त्याला जीव म्हणतात. जेव्हां शरीर मरते तेव्हां तो जीव जो अव्यक्त प्रेरणा आहे आणि जो मन आणि

बुद्धीला कार्यरत करत असतो, तो जीव त्याचे कर्मविपाक माझ्यात लिंगदेहाच्या रुपाने एकरुप करतो. शरीरात असताना मी क्षेत्रज्ञ म्हणून ओळखला जातो.
युगांताच्या वेळी मी सगळे आटोपते घेऊ लागतो. त्यामध्ये सगळे प्रथम पाण्यात सामावले जाते, त्यानंतर अग्नी ते सगळे संपवतो. पंचमहाभूत अशारितीने विरून जातात. मी अव्यक्त पुरूष उरतो त्या विचार सागरात जे अध्यात्मिक उर्जेचे स्रोत आहे. मी पुन्हा नवीन सृष्टी उत्पन्न करतो त्यात शेषाच्या रुपात शंकराशन म्हणून मी येतो. सृष्टीचे मन ज्याला प्रद्युम्न म्हणतात ते कार्यरत होते. त्यातून पुन्हा सगळे उगवू लागते पहिल्या सारखे. प्रद्युम्नातून जाणीवा तयार होतात त्यांना अनिरुद्ध म्हणतात. तोंच त्या नव्या सृष्टीचा ईश्वर असतो. त्यातून सगळे चराचर पुन्हा उत्पन्न होतात नव्या नियमानुसार. ते अक्षर आणि क्षर त्या सृष्टीत वाढत जातात एका माझ्यामधून. मला पुरूष म्हणतात. मला त्या विरुद्ध भूमिकांचे बंधन नाही. सगळ्या टोकाच्या (सुख-दुःख, आनंद- निराशा, प्रेम- द्वेष, मोह-औदासिन्य, पाहिजे-नको, क्रोध-समाधान, स्तुती-टीका, मान-अपमान, आदर-तिरस्कार, परकेपणा-आपुलकी, सुवर्ण-पाषाण, थंड-गरम, चांगले-वाईट, मान्य-अमान्य, जीवन-मृत्यू, आकर्षण-विरोध इत्यादि) भूमिका. त्यातून जो मुक्त झाला तो मोक्षसाधनेसाठी योग्य समजला जातो.
अरे नारदा तू किंवा कोणीही मला पूर्ण स्वरुपात कधीच ओळखू शकणार नाही. म्हणून जर तुझा गोंधळ होत असेल तर त्याबद्दल जास्त चिंता करू नकोस. मी कारण कर्ता आणि परिणाम असें तिनही असतो. जरी मायेच्या प्रभावात ते निरनिराळे भासत असतात. जेव्हां नवीन सृष्टी उत्पन्न होते तेव्हां मला हिरण्यगर्भ असें समजतात. त्यावेळी मला चार मुख असतात, म्हणून मी ब्रह्मदेव समजला जातो. रुद्र माझ्या क्रोधातून आले. ते जगाला मर्यादा शिकवण्यासाठी असतात. तो रुद्र तू माझ्या डोक्यावर पहात आहेस. त्याशिवाय बारा आदित्य माझ्या उजव्या कडेला तुला दिसत आहेत. आठ वसू माझ्या पुढ्यात तुला दिसत आहेत. आश्विनीकुमार माझ्या मागे तुला दिसतील. सगळे प्रजापति आणि सात ऋषी माझ्या बाजूला तुला दिसतील. वेद, सगळे यज्ञ, अमृत, अनेक औषधीच्या देवता तुला दिसत आहेत परंतु, ते तुझ्या

आकलनात येत नाहीत कारण अरे नारदा, तुझी आकलन क्षमता अपूरी आहे. तेथे श्री आणि लक्ष्मी पहा त्या माझ्यात आहेत. त्याशिवाय किर्ती, यश असे सगळे ज्यासाठी मनुष्य धडपडत असतो ते माझ्यात तुला दिसतील. सरस्वती वेदांची माता माझ्यात तुला दिसेल. तीन प्रसुख पितर आणि तीन गुण तुला माझ्यात दिसतील, सगळ्या नद्या, तलाव, सरोवर, समुद्र ह्याचे देव (त्यांचे नियंत्रण करणारे देव) तुला माझ्यात दिसतील. यज्ञात दिलेले प्रसाद मी खातो. मी प्राचीन काळी ब्राह्मण उत्पन्न केले जे माझी पुजा करतात त्यावर संतुष्ट होऊन मी त्यांना अनेक वर दिले आहेत. त्याला मी वर दिला कीं कल्पाच्या प्रारंभी तो माझा मुलगा म्हणून जन्म घेईल. त्याला सगळ्या जगाचे राज्य मी दिले. तोंच अहंकार आहे. त्यानंतर निवृत्तीचा मार्ग मी सांगितला. ते सांख्याने सांगितले आहे. निवृत्तीत गेलेला आणि मी ह्यात फरक असा असतो कीं, निवृत्ती मध्ये अहंकार असतो व मी अहंकार विरहीत असतो. तो अहंकार लिंगदेहाच्या रुपाने त्याच्यात (त्या आत्म्यात) शाबूत असतो मला लिंगदेह नसतो. कारण लिगदेहाने आत्मा मायेला बांधलेला असतो. ज्या आत्म्याचे लिंगदेह संपले तो माझ्या येऊन जातो म्हणजे त्याला मोक्ष प्राप्त होतो. वेदांतील छंदांतून माझा वारंवार उल्लेख होत असतो जे मला जाणत असतात ते ते छंद गातात. हजार युगानंतर मी हे विश्व माझ्यात आत्मसात करणार आहे. सगळे वास्तविक जग तेव्हां नसेल. फक्त अव्यक्त मी असेन. माया माझ्यात समाविष्ट झालेली असेल. माझी अनेक रुप, शंकरसेना, अनिरुद्ध, प्रद्युम्न कोणीही नसेल. माझी निद्रा संपल्यावर मी पुन्हा नविन सृष्टी निर्माण करीन जर मला वाटले तर. पुन्हा ते सगळे सुरू होईल. निर्मिती, विनाश, निर्मिती पुन्हा विनाश असे सत्र चालू राहिल. अरे नारदा, कित्येकानी मला सदेह पहाण्याचा प्रयत्न केला पण ते त्यांना जमले नाही. परंतु, तुला ते जमले कारण तुझी भक्ती निर्दोष आहे. तुझ्या भक्तीत अहंकार नाही. तुझी भक्ती निरपेक्ष आहे. तुझ्या भक्तीत प्रेम नाही, तुझी भक्ती सन्मानावर आणि म्हणून सद्भावावर आहे. प्रेमात हेतू असतो म्हणून तशी भक्ती मला आवडत नाही. प्रेमात व्यवहार असतो म्हणून ते मला आवडत नाही. निर्हेतूक निष्काम भक्ती मला आवडते. म्हणून तू मला पाहू शकत आहेस. हेंच माझे रहस्य आहे.

भिष्म पुढे सांगतात, ते विवेचन केल्यावर परमेश्वर अंतर्धान पावले. त्यानंतर नारद सुद्धा मोठ्या उत्साहाने बद्रीकडे निघाले. तेथे त्याना नर आणि नारायण पहावयाचे होते त्यांच्या नव्या अवतारात. तेथे पोहोचल्यावर नारद जे त्यानी अनुभवले ते सगळ्यांना सांगितले. त्यात नारायणानी जे विवेचन त्यांच्या अवतारांचे केले तेसुद्धा त्याने सगळ्यांना सांगितले. ते पुढे नारदाचे पंचरत्र म्हणून ओळखले जाऊ लागले.

युधिष्ठीर पुढे विचारतात, "ब्रह्माला ते नारायणाच्या विविध अवतारांचे विवेचन माहीत असणार जे नारदाने पंचरत्रात गाईले. मला सांगा पितामह ब्रह्मदेव नारायणापेक्षा कमी आहेत कां"?

भिष्म सांगतात, हजारो कल्प आणि असंख्य निर्मिती झाल्या आहेत त्या प्रत्येकांत ब्रह्म उत्पन्न झाले आहेत त्या त्या सृष्टीचे काम पहाण्यासाठी त्याना ते माहीत असेल कदाचित. ही जी पंचरत्री नारायणानी सांगितली ती ह्या कल्पाची आहे आणि अजून कितीतरी कांहीं होणार आहे. नारायण तोंच असतो पण ब्रह्मदेव निराळा असू शकतो. म्हणून नारायण ब्रह्मापेक्षा श्रेष्ठ आहे. हि पंचरत्री त्या प्राचीन ऋषींनी प्रथम गाईली जी सूर्याने नंतर आणखीन साठ हजार ऋषींना गाऊन सांगितली. त्यातून ती वेदात गेली. तेथून नारदाने पुन्हा सांगितली. ती यथाक्रम असितानी ऐकली व त्यांनी पितृ राजाला सांगितली. मी माझ्या पित्या कडून शंतनु कडून ती ऐकली. ती मी तुला सांगितली. ते एक पुराण आहे, त्यातून इतर अनेक पुराणं तयार झाली. वासुदेवाचे भक्त ते पुराण पुढे चालवतात. जसे प्राचीन काळी देव आणि असुर समुद्र घुसळून अमृत काढतात त्याप्रमाणे हे पंचरत्र घुसळून त्यातून हे कथामृत तयार केले अनेक ऋषींनी. जो हे पंचरत्र मनापासून ऐकेल आणि ऐकवेल तो त्या शुभ्र बेटावरील रहवाशी होईल असे समजले जाते. अरे तोच जनार्दन आपला कृपाळू आहे त्याच्या कृपेत रहा, पांडवानो.

वैशंपायन पुढे सांगतात, ते पंचरत्र ऐकल्यावर सगळे पांडव जनार्दनाचे भक्त झाले. ते नारायणाचा आवडता जपयज्ञ करण्याचा निश्चय करतात. नारद त्या शुभ्र सागरावरून आकाशातून प्रवास करत त्यांच्या आश्रमात गेले.

भिष्म पुढे सांगतात, मी तुला ते सांगितले जे नारद सांगत होते. ते वैशंपायनाने जनमेजयाला सांगितले होते. मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सद्दुसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे अठ्ठूसष्ठावा

शौनक बोलतात, नारायण जो देवादिदेव आहे आणि जो वेदाचा जाणकार आहे, जो यज्ञ करतो व त्याची फळं उपभोगतो, जो क्षमाशिल आहे, तो निवृत्ती व्रत कां स्वीकारतो. त्यानेच निवृत्ती व्रताचे नियम ठरवले आहेत हे निश्चित. असे असतांना तो अनेक देवतांना यज्ञाचा हिस्सा घेण्याचा आग्रह कां करतो ज्यात प्रवृत्ती आहे? असे विरोधी तो कां वागतो"? एका बाजूला तो त्यागाचे महत्व सांगतो व त्याच वेळी दुसरी कडे तो मतलबाच्या धोरणाचे समर्थन करत असतो. अहो सुता, माझ्या मनातील ह्या संशयाचे आपण निरसन करावे. ह्यात मोठे रहस्य आहे ते समजावून सांगा. आपण नारायणाचे सगळे विचार जाणता म्हणून आपणच ते करू शकाल असे वाटते. सुत सांगतो, "अहो शौनका, मी तुम्हास वैशंपायनांचे विचार सांगतो जे व्यासाचे शिष्य होते. ते त्यानी सांगितले जेव्हां जनमेजय त्यांना हांच प्रश्न विचारतो".

जनमेजय विचारतो, सगळे जग ज्यात ब्राह्मण, असुर, देवता असे सगळे आहेत ते सगळे मोक्षाऐवजी कांहीं ऐहीक सुखासाठी प्रयत्न करत असतात, कारण मोक्ष साधना सोपी नाही. त्यापेक्षा भोग साधना तुलनेने सोपी असते. कदाचित त्यामुळें सगळ्या भोग देवता त्याना मिळणार्या प्रसादात जास्त ध्यान देत असाव्यात. यज्ञ देवतांना प्रसन्न करण्यासाठी केले जातात कारण त्या देवता यज्ञ करणार्याच्या इच्छा पूर्ण करत असतात. त्यात सगळ्याच देवता येतात, ब्रह्म स्वतः, रुद्र, शक्र, सूर्य, चंद्रमा, वायूदेव, वरूण, अग्नीदेव, आणखीन कित्येक इतर देवता यज्ञाचा वाटा घेऊन त्या बदल्यात यजमानाचे इप्सित पुरे करण्याचे आश्वासन देत असतात. कदाचित त्यासाठी त्या देवतासुद्धा मोक्षाच्या मागे लागत नाहीत. ते सकाम कर्मयोग म्हणजे प्रवृत्तीचा आग्रह धरतात. त्यात मिळणारे फळ क्षणभंगूर असले तरी त्यातच ते रमणे पसंत करतात. माझे ह्याबद्दलचे मत मी सांगितले त्या क्षणभंगूर फळांसाठी देवता यज्ञात भाग घेतात ते

समजते पण नारायणसुद्धा त्याला मान्यता देतात ह्याचे मला आश्चर्य वाटते. कृपया त्या बद्दलच्या माझ्या शंकेचे निरसन करा.

वैशंपायन सांगतात, तुझ्या प्रश्नाचे उत्तर एका रहस्यात आहे. ज्याने तपस्या केली नाही व ज्याने पुराणांचा अभ्यास केला नाही तो ह्याचे उत्तर समजू शकणार नाही. आमचे गुरू ज्यानी वेदांची पुनर्रचना केली त्याने ह्याबद्दल मला सांगितले ते मी तुला सांगणार आहे. सुमंत, जेमिनी, पैल, मी आणि शुक असें आम्ही पांच शिष्य होतो आम्ही आमच्या वासनांचे नियत्रण पूर्णपणे केले होते. आम्हालासुद्धा असे प्रश्न पडत होते. एकदा व्यास आम्हाला त्या प्रश्नाचे उत्तर देतात ते असे आहे, ते सांगतात, नारायण त्यांच्यावर प्रसन्न झाले होते. ते सांगतात, त्यांनी अनेक कल्प जग रहाटी पाहिली आहे. त्यात त्याना समजते कीं, अहंकार आणि पंचमहाभूत सगळ्या देवतांना सांभाळण्यासाठी दिले आहेत. त्या देवता यज्ञाच्या यजमानाचे इप्सित पूर्ण करण्यात बांधलेल्या आहेत. त्यासाठी त्यांना त्या यज्ञाचा त्यांचा हिस्सा घेण्याचा अधिकार ब्रह्माने दिला आहे. असे त्या संदर्भात ब्रह्म सांगतात.

वैशंपायन पुढे सांगतात, त्या देवादिदेवाचे ते आश्वासन ऐकून सगळे देव देवता आणि ऋषी आनंदाने नाचू लागले. ते ताबडतोब विष्णूच्या सन्मानार्थ एक यज्ञ आयोजित करतात. कारण तसे संहितेत दिले आहे की, जेव्हां विष्णू कांहीं आश्वासन देतात त्याच्या सन्माना प्रित्यर्थ यज्ञ आयोजन आवश्यक असते. त्या यज्ञात ब्रह्मसुद्धा भाग घेतात व त्याचा हिस्सा ते विष्णूला देतात. इतर देवदेवता आणि ऋषी तसें करतात. तसे कृतयुगाच्या काळासाठी जे नियम संहितेत दिले आहेत त्याप्रमाणे ते होत होते. ते पाहून समाधान पावलेला तो अंतिम परमेश्वर आकाश वाणीने त्यांचे कौतुक करत बोलतो, "जे तुम्ही दिले ते मला मिळाले आहे. ह्यापुढे प्रवृत्तीच्या (सकाम कर्माच्या, जे यज्ञ मोक्षासाठी असतात ते निवृत्तीत असतात) भल्यासाठी प्रत्येक युगात मी तुम्हाला यज्ञाचा हिस्सा घेण्याची परवानगी देत आहे. तसे झाल्यामुळें त्या यज्ञ करणार्या यजमानाचे भले करण्याची तुमच्यावर जबाबदारी असेल. प्रवृत्तीच्या यशासाठी जे यज्ञ होतील ते सगळे तुमच्या आधिपत्याखाली असतील हे ठरले. पुढे देवाधिदेव बोलतात कीं, ह्या व्यक्त सृष्टीचे कारभार तुमच्या कडे मी सुपूर्द करत आहे, त्याप्रमाणे हि सृष्टी चालवण्याचे कार्य

तुमचे असेल त्या करता जे यज्ञ सकाम प्रेरणेने होतील त्यावर तुमचा हक्क असेल. आणि जर तो हिस्सा तुम्ही घेतला तर त्या यज्ञकर्त्याला त्या यज्ञाच्या उद्देशात यशस्वी करणे तुमची जबाबदारी असेल. हा एक व्यवहार समजून तुम्ही ते कराल. प्रवृत्तीतील कर्मभोग साध्य करण्याच्या कामात माझे इच्छा मुलगे जे सात ऋषी आहेत (मरिची, अंगिरस, अत्री, पुलस्त्य, पुलह, क्रातू आणि वसिष्ठ) ते त्यामध्ये तुम्हाला मदत करतील. ते वेदाचे मुख्य शिक्षक म्हणून काम पहात आहेत माझ्यावतीने. ते प्रवृत्ती कार्यरत ठेवतील. त्यांच्या कृपेने प्राणिमात्रात संतति उत्पन्न होईल आणि जीवांचे व्यवहार होत रहातील. त्या कामात मदत करणार्या देवता असतील, अनिरुद्ध, शना, सनतसुजात, शनकसनंदन, सनतकुमार, कपिल, सनातन आणि ते त्या सात ऋषीच्या आज्ञेने त्यांचे काम करतील. हे सातजण ब्रह्माचे इच्छा पुत्र असतील. ते जात्या पूर्णज्ञानी असतील. ते मायेचे नियमन करतील. अव्यक्त प्रकृतीतून विविध जाणीवा उत्पन्न होतील, त्या जीवांचे जीवन घडवत असतील. त्यात अध्यात्मिक उर्जेच्या नियमनाने सत्त्व, रजस आणि तमस असे तीन गुण तयार होतील ते त्या अव्यक्त प्रकृतीला व्यक्त करतील. त्यातून पुढे सृष्टीचे कार्य होत राहील. त्या प्रकृतीच्या पलिकडे मी क्षेत्रज्ञ आहे. ज्यांचे काम त्यांच्या अहंकारातून उत्पन्न होत असते ते प्रकृतीचा (मायेचा) हिस्सा असते. अहंकारातून जे जे घडते ते सगळे ह्या सात ब्रह्मपुत्रांच्या नियंत्रणाखाली असेल. ज्यात अहंकार नाही ते निवृत्तीत असेल व त्याचे नियंत्रण क्षेत्रज्ञ म्हणजे मी करणार असेन. कोणी जे अहंकाराच्या ताब्यात आहेत ते प्रवृत्तीत असतात व जे अहंकाराच्या बाहेर असतात ते निवृत्तीत असतात. अशारितीने सृष्टीचा कारभार चालेल. असे सांगून नारायण त्या जमलेल्या दैवी अभिजनांना आज्ञा करतात कीं ते आपापल्या ठिकाणी जातील.

व्यास पुढे सांगतात, सगळे देव आणि ऋषी गेले तरी ब्रह्मदेव तेथेच थांबले त्याला अनिरुद्धाला (घोड्याचे मुख असलेले नारायणाचे एक रुप) भेटावयाचे होते. तो ब्राह्मणाच्या रुपात होता. त्याच्या हातात कमंडलू होते आणि दुसर्या हातात ब्राह्मणाची काठी होती. तो वेद पुटपुटत होता. ब्रह्मदेव वाकून त्याला नमस्कार करतात. त्यांचे एकमेकांना मिठी मारण्यानंतर ब्रह्मदेवाला त्या घोड्याचे मुख असलेले नारायण बोलतात,

"मी तुझ्यावर मोठी कामगिरी सोपवलेली आहे. तू ह्या सृष्टीचा आता सर्वासर्व झाला आहेस, मी आता निश्चिंत होईन. तरी जर अशी विलक्षण मुष्किल परिस्थिती उत्पन्न झाली तर मी तुला मदत करण्यासाठी असेन. ते बोलल्यानंतर घोड्याचे मुख असलेला अनिरुद्ध अंतर्धान पावतो. अशाप्रकारे प्रवृत्तीच्या यज्ञाच्या हिस्श्याची गोष्ट निश्चित झाली. फक्त मोक्षासाठी जे यज्ञ होणार त्याचा सगळा हिस्सा नारायणाचाच असतो. मी तुम्हाला ते सगळे सांगितले ज्याबद्दल तुम्ही मला विचारले होते. अशा नारायणाची तुम्ही पुजा कराल जपयज्ञ करून सदासर्वदा.

वैशंपायन पुढे सांगतात, वेदाचा कर्ता अशाप्रकारे आमच्या त्या समस्येचे उत्तर देतात. त्यांचा मुलगा आणि आम्ही चौघे ते ऐकत होतो. मी तुझ्या शंकेचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. हे आख्यान जे मनापासून ऐकतील ते कधी आजारी होणार नाहीत. तो दिर्घायुषी होईल. क्षत्रिय युद्धात जिंकतील. वैश्यांचे उद्योग भरभराटीला जातील. शुद्रांचेसुद्धा भले होईल. निपुत्रिकांना पुत्र होईल. कुमारीकेला चांगला पति मिळेल. जर स्त्री पुत्रकामना करत असेल तर तिला पुत्र होईल. ज्या गृहस्थाला वंश वृद्धी अपेक्षित असेल तर ती होईल. जे जो वांच्छिल तो ते प्राप्त करेल अशी भगवंताची कृपा होईल.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे अडूसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे एकोण सत्तरावा

जनमेजय विचारतात, अहो पुण्यवंत, मधूच्या व्याधाची विविध नांव व्यास घेतात त्यांचा अर्थ काय ते मला सांगा. मला ती सगळी हरीची जो विश्वनाथ आहे, नांव सार्थ ऐकण्याची इच्छा आहे. कदाचित ती समजून घेण्याने माझे चित्त शुद्ध होण्यास मदत होईल असें मला वाटते. वैशंपायन सांगतात, ऐक माझ्या राजा, मी ते सांगतो, त्या नांवांचे रहस्यमय अर्थ. तो फाल्गुनी जो शत्रूंचा संहार करतो. तो एकदा केशवाला विचारतो, त्याच्या विविध नांवांचे रहस्य काय आहे.
अर्जुन विचारतो, अहो भगवान, सृष्टीचे नियामक, जीवांना उत्पन्न करणारे, निर्विकल्प ज्याच्या कडे सगळे कृपेची अपेक्षा करतात, विश्वनाथा, भक्तांचे संरक्षण करणार्या, मला तुझ्याकडून तुझ्या नांवांचे रहस्य समजून घ्यावयाचे आहे. ती नांव महर्षी घेत असतात जेव्हां ते तुझी आराधना करतात. ती सगळ्या पुराणात सापडतात. तुझ्याशिवाय दुसरा कोणी त्याबद्दल मला सांगणार"?
भगवंत त्याला सांगतात, ऋग्वेदात, यजुर्वेदात, अथर्ववेदात, आणि सामांत तसेंच पुराणात उपनिषदांत, तसेंच ज्योतिष्यात अरे अर्जुना सांख्यात योगात आणि इतर शास्त्रांत माझी अनेक नांवं ऋषींना घेतली आहेत. त्यातील कांहीं माझ्या विशेष गुणांची आहेत. कांहीं माझ्या कृत्यांवर आहेत. ती मी तुला सांगतो ते लक्ष देऊन ऐक, प्रथम माझ्या कृत्यावर आधारीत जी आहेत ती सांगतो, तुला माहित आहे गेल्या कल्पात तू माझाच हिस्सा होतास जरी आता आपण दोन वेगळे जन्मलो असलो. म्हणून त्यावेळापासून माझे नांव नारायण आहे. ज्यात तू सुद्धा आहेस. जो विश्वाचा निर्माता आणि सत्त्व, रज आणि तम ह्या अध्यात्मिक अवस्थांच्यावर आधारीत सृष्टीच्या व्यवस्थेचा कर्ता आहे. त्या नारायणाला नमस्कार. त्याच्या शांतवृत्तीतून ब्रह्मदेव अवतरले, त्यांच्या क्रोधातून रुद्र तयार झाला. त्याच्या इच्छेतून चराचर सृष्टी निपजली. सत्त्व गुणाचे अठरा प्रकार आहेत. त्यातून परब्रह्म निपजले. त्यातच पंचमहाभूत सामावलेली आहेत. त्यालाच निसर्ग म्हणतात. तो मींच आहे. त्याच्या

चैतन्याला चित्त म्हणतात. ते अमर आहे. ते नित्य आहे जरी बदलत असले तरी ते खर्या अर्थाने बदलत नसते. त्यात भ्रम काम करत असतो. जो माझ्या मायेचा विशेष गुण आहे. त्यात जो मी असतो त्याला परमेश्वर म्हणतात. मला प्राप्त करण्यासाठी तपस्या करतात ती तपस्यासुद्धा मींच आहे. जो त्याग करतात तो त्यागसुद्धा मींचा आहे. तो पुरूष जो सनातन आहे तो मींच आहे. त्याला विशेष परिस्थितीत अनिरुद्ध म्हणतात. अनिरुद्ध रागावला तेव्हां त्याच्या माथ्यातून रुद्र उत्पन्न झाला. तो विनाशाचा देव ठरला. अनिरुद्धाच्या कृपेतून ब्रह्मदेव आला. निरनिराळ्या प्रसंगी अनिरुद्धाला राग आला तेव्हां निरनिराळ्या वेळी निरनिराळे रुद्र उत्पन्न होत होते. ते अनेक आहेत. माझे ते रुप वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळी रुप घेत असतो हे विश्व चालवण्यासाठी. कधी घडवतो तर कधी मोडून टाकतो. ते करणारा मी कपर्दीन म्हणून ओळखला जातो. त्याचे रुप जटाधारी, चर्मवस्त्रधारी, स्मशानात रहाणारा, पिशाच्चांचा देव बनून मी असतो. तो घोर तपस्या करत असतो. जो माझा स्वभाव आहे. तो योगीराज म्हणून ओळखला जातो. त्यानेच दक्षाचा यज्ञ मोडला आणि भागाचे डोळे फोडले. रुद्राचा आत्मा नारायण असतो. त्या महेश्वराची जेथे पुजा होते तेथे नारायणाची पुजा होत असते. मी सगळ्यांचा आत्मा असतो. प्रत्येक जीवांत मी असतो. मी रुद्रात आहे तसेंच रुद्र माझ्यात असतो. आम्ही सदैव एकमेकांत असतो. त्यांची तुलना करू नये. कारण ते एकच आहेत. त्यालाच ईशान म्हणून सुद्धा ओळखतात. विनाशाचे काम करताना रुद्र असतो व घडवण्याचे काम करतांना नारायण असतो. ती माझी कामावरून ठरवलेली नांव आहेत. मी विष्णू म्हणून रुप घेतले ते सृष्टी चलवणार्या मायेला मदत करण्यासाठी. विष्णू फक्त माझ्यापुढे नमन करतो इतर कोणाला तो नमस्कार करणार नाही. सगळ्या देवता नारायणाला वंदन करतात. नारायण कोणाला वंदन करत नाही शिवाय त्याचे निस्सीम भक्त. कारण तो भक्तमय होतो. अरे कुंतीपुत्रा , माझे चार प्रकारचे भक्त आहेत, ते जे भावनिक रित्या माझ्यात येऊन मिळण्याचे पहातात, ते जे विवेकाने तर्काने माझी परीक्षा घेत असतात, ते जे अंधश्रद्ध सकाम असतात आणि चौथे ते जे सूज्ञ असतात. त्यातील जे भावनिक रित्या माझ्यामध्ये स्वताला पहातात ते श्रेष्ठ भक्त मी समजतो. ते निष्काम कर्म करत असतात

कारण ते माझ्यासाठी जगत असतात. त्यांच्यावर माझे विशेष लक्ष असते. ते पुण्य मिळवत असतात ज्यामुळे ते स्वर्गात जातात परंतु, पुण्य संपले कीं परत जन्म घेतात. कांहीं माझ्याशिवाय माझ्या इतर रुपांची आराधना करतात तरी मी त्यांना प्रसन्न होत असतो कारण ते जी रुप पुजतात ती मींच असतो. फक्त त्याना त्याचे ज्ञान नसते. त्यांच्या सकाम भक्तीला त्याप्रमाणे मी फळ देतो. माझ्या देवतांच्या माध्यमातून. भक्ती किती प्रामाणिक आहे हे महत्वाचे असते मग ती कोणत्याही प्रकरची असो. मी तुला सांगितले माझ्या भक्तांच्या तर्हा. पृथ्वीवरील पापाचा भार कमी करण्यासाठी मी व तू आलो आहोत व युद्ध करून ते साध्य केले आहे. मी सगळ्या जीवांचा आधार आहे म्हणून मला वासुदेव म्हणतात. मी सगळे व्यापतो म्हणून मला विष्णू म्हणतात. कांहीं मला दामोदर म्हणतात तर कांहीं मला प्रिश्नी म्हणतात. कारण त्यात वेद, पाणी आणि अमृत आहे. असे सांगतात कीं, फार प्राचीन काळी माझा भक्त त्रिता माझ्यावर ध्यान करत असतांना त्याला त्याचे दोन भाऊ एकता आणि द्विता द्वेषभावाने एका खंदकात ढकलतात. त्या खंदकात त्रिता माझी पुजा करतो त्यासाठी फुल नसतात तेव्हां तो तेथे असलेले दगड गोटे मला भक्तीभावाने अर्पून ती पुजा करतो. त्याची देण्याची दानत मला भावते. मी त्याच्यावर प्रसन्न होतो व त्याला त्या खोल खंदकातून बाहेर काढतो. हि देण्याची दानत महत्वाची असते, काय दिले कीती मौल्यवान दिले ते महत्वाचे नसते कारण अरे कुंतीपुत्रा , तुम्ही जे देता ते माझेच असते त्याच्या मुल्याला माझ्याकडे कांहींच किंमत नसते. मी भावाचा भुकेला असतो तो जो मला देतो तो मला प्रिय असतो व मी त्याला मदत करतो असा माझा साधा सरळ हिशोब असतो. त्रिताच्या भक्तीमुळे तो तरला. सूर्याचे किरण माझे केस आहेत म्हणून माझे नांव झाले केशव. त्या नांवांने जे माला भजतात त्यांच्या कामना मी पूर्ण करतो. उतथ्याचा मुलगा दिर्घात्मा माझी पुजा केशव म्हणून करत असे म्हणून तो जन्मांध होता त्याला डोळे मी दिले. त्यांने वेदाचा मोठा अभ्यास केला. पुढे त्याला गोतम म्हणून ओळखू लागले. अरे अर्जुना, अग्नी (उदरातील) आणि सोम (खाद्य) हे फार प्राचीन काळापसून पुजले जात आहेत ते एकमेकांत मिळून गेल्याने चराचराचे जीवन बनत असते. त्यांत मी असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे एकोणसत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग एकशे सत्तरावा

अर्जुन पुढे विचारतो, अर्जुन विचारतो, "अग्नी आणि सोम ह्यांचे काय संबंध असतात"?

भगवान सांगतात, त्यासाठी मी तुला एक कथा ऐकवणार आहे. ती माझ्या अध्यात्मिक उर्जेतून घडली होती. दैवी परिमाणानुसार जेव्हां चार हजार युग संपली होती, युगांतराची वेळ आली होती. व्यक्त (दृष्य) अव्यक्तात (अदृष्यात) विलीन होणार होते. सगळे चराचर नष्ट होणार होते. सगळी पंचमहाभूतं (पृथ्वी, पाणी, वायू, आकाश, अग्नी) महतात विलीन झाली होती. सर्वकडे अध्यात्मिक आणि वैचारिक तमस पसरला होता. एक प्रकारची गोंधळाची परिस्थिती होती. तेथे सत आणि असत असें दोनही नव्हते. फक्त विचार लहरी असलेले जल (विचार सागराचे पाणी) उसळत होते. त्यातून पुन्हा एकदा त्या अनिश्चित अज्ञानमुलक परिस्थितीतून हरी त्याचा आकार घेऊ लागला. तो मुळात निर्गुणी नारायण सगुण होऊ लागतो. तो अक्षर, नित्य हरी चिंतामणी सारखा चमकत होता. त्यात विविध गुण उपजू लागतात. निराकार ब्रह्म साकार होऊ लागते. प्रथम काळ उपजतो. त्याच्या मांपनाने इतर गोष्टींचे मापन होऊ लागते. अध्यात्मिक उर्जेचे निरनिराळ्या पातळीवर विभाजन होते त्यातून मोघमपणे सत्त्व, रज आणि तम असे तीन गुण तयार होतात. विरोधी प्रवृत्तीच्या टोकाच्या भूमिका (सुख-दुःख, आनंद- निराशा, प्रेम- द्वेष, मोह-औदासिन्य, पाहिजे-नको, क्रोध-समाधान, स्तुती-टीका, मान-अपमान, आदर-तिरस्कार, परकेपणा-आपुलकी, सुवर्ण-पाषाण, थंड-गरम, चांगले-वाईट, मान्य-अमान्य, जीवन-मृत्यू, आकर्षण-विरोध, दयावान-निर्दयी इत्यादि) तयार होत होत्या. त्यामुळें असंख्य गुण विशेष तयार होत होते. आता पंचमहाभूत आकार घेऊ लागतात. त्यातील अग्नी आणि सोम नारायणाच्या मुखातून बाहेर आले. प्रथम सोमातून ब्राह्मण त्याने निर्मिले. त्यात जे सदोष होते त्याच्या प्रमाणानुसार कमी जास्त ब्राह्मणत्व असलेले जे तयार होत होते त्यातून क्रमशः क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र घडले. त्यानंतर सोम ब्रह्माचे

रुप घेऊन पुढे आला. अग्नीने क्षत्रियत्व धारण केले. ब्राह्मण त्यामुळे इतर वर्णांपेक्षा श्रेष्ठ ठरले. तसें पहाता एकाच व्यक्तीत ते सगळे चार गुण असतात परंतु, तो जे गुण वाढवतो त्या गुणाचा तो जन्माने होतो. म्हणून ते चार वर्ण जन्माने ठरतात. मनुष्य त्याची गुणवत्ता सुधारून वरच्या वर्णाचा होऊ शकतो. मग तो जन्माने कोणीही असेल. ते श्रृतीतील मंत्रात दिले आहे. अग्नी यज्ञाचं मुख्य असतो म्हणून तो राजा होतो. देवता लोकांचे भले अथवा बुरे करू शकतात क्षत्रियाच्या माध्यमातून. म्हणून क्षत्रिय ब्राह्मणांनंतरच्या क्रमांचा श्रेष्ठ ठरला. ब्राह्मण सर्वात उच्च म्हणून त्यांची जबाबदारी इतर कमी दर्जाच्या समाज सदस्याचे भले करण्याची चांगुलपणाच्या नियमानुसार. ते न केल्यास तो शुद्र ठरतो. राजा ऐहिक हित जपण्याचे कार्य करण्यासाठी असतो समाजाचे त्याप्रमाणे ब्राह्मण अध्यात्मिक हित जपण्याचे कार्य करणार, अशी दैवी अपेक्षा असते. जर ते न झाले तर ते दोघे समाजाचे शत्रू समजले पाहिजेत. अग्नीची अनेक रुप सांख्य सांगतात. ती त्याच्या विविध अवस्थेनुरुप आहेत. उदरातील अग्नी खाद्य पचवतो म्हणून तो सर्वोच्च (ब्राह्मण) समजला जातो. सगळे जग भस्मसात करणारा अग्नी नीच (शूद्र) समजला जातो.

अर्जुन विचारतो देव आणि असुर ह्यांत कोणत्या कारणाने भेद असतो तो मला समजत नाही तरी ते मला सांग.

नारायण सांगतात, अहंकार असणे व नसणे ह्यावर तो भेद ठरत असतो. म्हणून मी तुला दैवीसंपदा आणि असुरीसंपदा सुरूवातीलाच सांगितल्या आहेत. असुराना अहंकार असतो व त्यांचे कार्य आणि विचार पद्धती अहंकारावर आधारित असते. देवांना अहंकार नसतो, ते ब्राह्माच्या कृपेने निरहंकारी जगत असतात. असुर त्याच्या अहंकारामुळें स्वार्थ प्रेरित जीवन जगत असतात. त्यांचा "मी", त्यांना माझ्यापेक्षा (नारायणापेक्षा) जास्त श्रेष्ठ वाटत असतो. ते घोर तपस्या स्वताच्या अहंकाराच्या पुष्ठीसाठी करत असतात. त्या तपस्येने ते ब्रह्म, महादेव अशां माझ्याच रुपांना प्रसन्न करून त्याद्वारा मोठ्या सिद्धी आणि आशिर्वाद प्राप्त करून सगळी धरती त्यांच्या असुरीसंपदेनुसार चालवण्याची कारवाई करत असतात. ते देवांच्या पवित्र प्रवृत्तीला आव्हान असें. म्हणून देव विरुद्ध दैत्य, दानव, राक्षस जे असुरांचे साध्यायी आहेत ह्यांच्यात युद्ध होत

होती. अहंकारामुळे स्वार्थ जागृत रहात असतो. त्यातून अनेक तामसी प्रवृत्तींचा उगम होतो. त्यांत तशाच अहंकारी प्रवृत्तीचे ऋषी त्याना मिळाले त्यात शुक्राचार्य, कवी, उशनास असे कित्येक आहेत, ते त्यांना त्यांच्या सिद्धीच्या मदतीने सहाय्य करत असतात हे असें प्रकृतीतील (मायेतील) प्रवृत्तीचे कार्य आहे. सामान्य मनुष्य देव (निरहंकारी प्रवृत्ती) आणि असुर (अहंकारी प्रवृत्ती) ह्यांच्यात त्याच्या अज्ञानामुळें रगडला जात असतो. प्रवृत्ती सृष्टी चालवण्यासाठी आवश्यक असते म्हणून ही देव-दानव तेढ अशीच चालू रहाणार आहे. मी नारायण जरी मुळांत निरहंकारी असलो तरी प्रकृतीच्या कामासाठी मी अहंकार धारण करून अनेक अवतार घेत असतो. त्यामुळें अहंकाराच्या प्रेरणेने काम करणार्यांना मी ह्या सृष्टीत पूर्ण विरोध करू शकत नाही. अरे नरा, प्रवृत्ती ही अहंकाराची आवृत्ती असते. म्हणून दैत्य, दानव, राक्षस असे अनेक असुर प्रबळ झाले आहेत. तुला अशी अनेक उदाहरणं दिसतील ज्यात अहंकार प्रेरित आणि निरहंकारी असे दोनही एकाच परिवारात आहेत. जे माणसांच्या परिवारातसुद्धा आढळते. विश्वरुप तिशत्रीचा मुलगा देवांचा पुरोहित झाला होता. परंतु, त्याची आई असुरांच्या प्रवृत्तीची (त्यांच्या बाजूची) होती. त्यामुळें जरी उघडपणे तो विश्वरुप देवांना यज्ञाचे फल देत होता गुप्तपणे तो त्याचा हिस्सा असुरांना देत होता. त्यामुळें असुरांचा मुख्य हिरण्यकश्यपू विश्वरुपाच्या आईकडून आश्वासन घेतो कीं, ती यज्ञाचा अर्धा हिस्सा गुप्तपणे असुराना म्हणजे तिच्या लोकांना तिच्या मुलाकडून मिळवून देईल. त्यामुळें त्यांची ताकद वाढत होती व देवांना ते कधी समजले नाही कीं, असें कसे होत आहे. अहंकारातून जे कांहीं ताकदवर गुण (दोष) उत्पन्न होतात ज्यात स्वार्थ, धूर्तता, लुच्चेगिरी, खोटेपणा, चतुराई, विश्वासघात करण्याची इच्छा, क्रौर्य, दुष्टपणा, अप्रामाणिकपणा, भ्रष्टाचार, चोरटेगिरी, दांभिकपणा, बनवाबनवी, मिथ्याचार इत्यादि त्यांमुळें ते देवांच्या पेक्षा जास्त प्रबळ ठरतात. कारण देव जे निरहंकारी असल्याने त्यांच्यात हे गुणदोष नसतात. देव व्रतस्थ असतात त्यामुळें ते तशा दोषपूर्ण गुणांना वाढवत नाहीत. त्यामुळे देव दानवांपेक्षा कमी हुशार शाबीत होतात व प्रत्येक वेळी युद्धात सुरूवातीला मार खातात असे तू पहात असशिल. तुझ्या कौरवांचे गुण तू जाणत आहेसच, ते असुर होते त्यांच्या प्रवृत्तीने. देव ते दोष नसल्यामुळे असुरांच्या

पुढे कमी ठरतात, ते सच्चाईने काम करणारे होते, तेव्हां त्यांना माझी गरज भासते व ती शेवटी मिळते हे तू पाहिले आहेस. पुढे विश्वरुप आईच्या सांगण्यावरून देवांचे पौरोहित्य सोडतो आणि हिरण्यकश्यपूचे पौरोहित्य घेतो. त्यामुळें हिरण्यकश्यपूचे पहिला असलेले पुरोहित वसिष्ठ जे दैवी प्रवृत्तीचे आहेत, रागावतात व त्याला शाप देतात कीं, त्याचा वध कोणी अमानवी शक्ति करणार त्याप्रमाणे माझे नृसिंह रुप त्याचा वध करते. ते तुला माहित आहे. विश्वरुप असुरांच्या भल्यासाठी मोठे उग्र तप सुरू करतो जे करण्याचे वसिष्ठाने नाकारले होते. त्यामुळेंच हिरण्यकश्यपूने त्याना अर्धचंद्र दिला होता. विश्वरुपाचे व्रत भ्रष्ट करण्यासाठी इंद्र त्याला मोहात अडकवण्यासाठी अप्सरा पाठवतो. त्या डावात तो भसतो. ते समजल्यावर त्या सुंदर अप्सरा त्याला सांगतात, आम्ही तुझ्या भोवती ह्यापुढे कधीच येणार नाही. ते ऐकल्यावर तो त्यांना बोलतो, "तुम्ही कोठे जाणार"? माझ्याकडेच रहा, मी तुमच्यासाठी कांहींही करीन". ते ऐकल्यावर त्या अप्सरा त्याला बोलतात कीं, तसे असेल तर त्या त्याच्या बरोबर रहातील. परंतु, त्या त्यांची अडचण सांगतात कीं, त्या आधीच इंद्राला बांधलेल्या आहेत. ते ऐकल्यावर विश्वरुप त्याना सांगतो कीं, तो असे कांहीं करील कीं, इंद्राचे सगळे देव नष्ट होतील. त्यानंतर तो त्याच्या मंत्र सामर्थ्याने त्याची ताकद वाढतो. त्याच्या एका तोंडाने तो देवांसाठी वाहिलेले सोम एकटा पिऊन टाकतो. त्याच्या दुसर्या तोंडाने तो यज्ञाचे देवांना वाहिलेले सगळे खाद्य खाऊन टाकतो. तिसर्या तोडाने तो त्याच्या मंत्र सामर्थ्याने इंद्राच्या सगळ्या देवांची ताकद शोषून घेऊ लागतो. असे करत असल्याने तो चहोबाजूने मोठा होत जातो. ते पाहून काळजीत पडलेले देव ब्रह्माला भेटतात. ते सांगतात कीं, देवांचे सगळे उर्जा स्रोत विश्वरुप खाऊन टाकत आहे, त्यामुळे आमचा हिस्सा आम्हाला मिळत नाही. असुरांची ताकद त्यामुळें वाढत आहे. आम्ही कमजोर होत आहोत. त्यासाठी असें कांहीं करा ज्यामुळे आमचे भले होईल. ब्रह्मदेव त्यांना सांगतात कीं, भृगूच्या वंशातील एक ऋषी दधीची मोठे अनुष्ठान करत आहेत. त्याच्या कडे जा आणि त्याला सांगा तो मदत करील. इंद्र त्यांच्याकडे जाऊन काय अडचण आहे ते सांगतो. दधीची जे देवांचे चाहते होते त्याला सांगतात की, विश्वरुपाला मारण्यासाठी माझ्या हाडांचे शस्त्र त्याला वापरावे लागेल त्यासाठी ते त्यांचा देह सोडण्यास राजी आहेत. असें

बोलून ते देहत्याग करतात. देवांचा शस्त्रकार त्वश्त्री त्यापासून वज्र तयार करतो ज्यावरुन मंत्रांचा प्रयोग करून विश्वरुपाला मारता येईल. ते घेऊन इंद्र विश्वरुपाला ठार मारतो. त्याचे शीर वेगळे करतो. त्या वेळी त्याच्या मनेतून एक असुर बाहेर येतो. त्याचे नांव वृत्र असते. विश्वरुप ब्राह्मण होता म्हणून त्याच्या वधाचे पातक इंद्राला घाबरवत होते. त्याचे इंद्रपद धोक्यात होते. पुढे विष्णूच्या कृपेने म्हणजे माझ्याच कृपेने तो अश्वयज्ञ करतो आणि ब्राह्म हत्त्येच्या पातकातून मुक्त होतो.

पुढे अर्जुन विचारतो, अरे नारायणा माझ्या मित्रा, तो वृत्र राक्षस होता. मला सांग असुरांतून राक्षस कसे तयार होतात. असुरांच्या अहंकाराला जास्त प्रेरणा देण्यासाठी जेव्हां मंत्र शक्ती आणि भ्रमसिद्धी त्या असुरांनी आत्मसात केली तेव्हां तो असुर राक्षस होतो. त्याच्या कडे मायावी सिद्धी असतात त्या असुरांना राक्षस असें समजले जाते. त्याची अनेक उदाहरणें आपल्या पुराणात आहेत. त्या सिद्धी प्राप्त करण्यासाठी ज्या तपस्या, योग साधना कराव्या लागतात त्या करण्याची क्षमता फक्त ब्राह्मणांत असू शकते म्हणून सगळे असुर जे राक्षस होतात ते पूर्वीचे ब्राह्मण असतं.

अर्जुन पुढे नारायणाला विचारतो मला सांग यक्ष कसे झाले ते देवांत गणले जातात असें कां तसेंच त्या अप्सरा आणि गंधर्व कसे झाले ते मला सांग. अरे अर्जुना गंधर्व, किन्नर अप्सरा ह्या अव्यक्त सृष्टीतील आहेत व त्यांचे मानवी रुप सहसा नसते तरी यक्ष माणसात असू शकतात. ज्या राक्षसांना देवांच्या निरहंकारी वृत्तीचे महत्व समजले त्यांच्या मंत्र साधनेमुळें त्याना देवांबद्दल आपुलकी व आस्था वाटू लागते व त्यातील कांहीं त्यांचे अहंकारी वृत्ती त्याग सुद्धा करतात जसे प्रह्लाद. त्यांतून यक्ष वृत्ती उत्पन्न होते. त्यांचे नेतृत्व वैश्रावण म्हणजे कुबेर करतो. अरे अर्जुना माणसात दैवी, असुरी, राक्षसी आणि यक्ष प्रवृत्ती तुला मिळतील. त्यातून जे मनुष्य स्वर्गात जातात त्यांच्या पुण्यप्रभावामुळें त्यातून स्वर्गातील जाती जसे अप्सरा, गंधर्व, किन्नर, कःपुरूष अशा स्वर्गीय प्रजाती तयार होतात स्वर्गात गेलेले पुण्यप्रभावी माणसे स्त्री-पुरूष त्या प्रजातीत रहातात. त्या सगळ्या स्वर्गीय प्रजाती पुण्यवान असतात. परंतु, त्यांचे पुण्य संपले कीं, ते पृथ्वीवर पुन्हा जन्म घेतात. त्यांच्यात ते गुण त्या मानवी अवतारात आढळतात. जसे उत्तम गाईकी, उत्तम नृत्यांगना वगैरे. आता माझ्या नांवां बद्दल

पुन्हा सांगतो, फार प्राचीन काळी पृथ्वी सागरात बुडली होती तिला मी बाहेर काढले म्हणून मला गोविंद म्हणतात. माझी कांहीं विचित्र नांव आहेत त्यातील एक आहे सिपीविष्टा. सिपी म्हणजे अंगावर केस नसणे माझ्या एका अवतारात मी तसा ऋषी यक्षाला दिसलो होतो. माझ्या त्या रुपात तो माझ्यावर ध्यान करतो आणि निवृत्ती पावतो. मी कधीच जन्म घेत नाही म्हणून मी अज म्हणून ओळखला जातो. मला क्षेत्रज्ञ म्हणतात कारण मी प्रत्येक जीवाच्या मध्यभागी असतो. सरस्वती जिचे नांव आहे रिता माझ्या जिभेवर असते म्हणून मी रिताधर झालो. मी सत्त्वगुणाचा देव समजला जातो. म्हणून मला कांहीं सत्त्वव्रत म्हणतात. मी कृष्ण वर्णाचा आहे म्हणून मला कृष्ण म्हणतात. मी कधी माझ्या स्थानापासून हलत नाही म्हणून मला अच्युत असे म्हणतात. यज्ञात तूप अग्नीला देणारे मला घृतर्ची म्हणतात. शरीरातील रसावरून मला ऋषी त्रिभूती असें समजतात. वेदाच्या व्याकरणात (निघंटू) मला वृष म्हणतात. काश्यप जे देव आणि असुरांचे पुरोहित होते मला वृष्यकपी संबोधतं. देव आणि असुर दोनही प्रवृत्तीच्या माणसांना माझे मूळ कधीच समजले नाही. ते माझा उल्लेख अनादी अमध्य अनंत असा करतात. मी सगळ्या उत्पत्ती आणि विनाशाचा कारण आहे म्हणून मला सुचीश्रव म्हणतात. मला एकश्रृंगी सुद्धा म्हणतात. कपिल मला वृरींच म्हणतात. माझ्या एका प्राचीन अवतारामुळे मला त्रिकाडू म्हणतात. कारण त्या अवतारात माझ्या मानेवर तिन वशिंड होती. सांख्य विचार सांगणार्या कपिल मुनीचे नांव मला देतात म्हणून मी कपील असतो. मला वेदात हिरण्यगर्भ म्हणतात. विद्वान ब्राह्मण माझ्या नांवाने अरण्यकांत साम गातात. मला ऋग्वेदाचा आत्मा समजतात. सगळे वेद त्याच्या शाखा मी दिल्या आहेत. मी वेद दिले, मी ते वाचावयाचे कसे ते शिकवले गवालाला जो वभ्रव्य वंशाचा होता, फार मोठा ज्ञानी होता. त्याने ब्राह्मणांना ते शिकवले. माझ्या कृपेने गवाला (गुराखी) लिहीण्याचे तंत्र शिकला व त्यांने ब्राह्मणांना शिकवले. मी शब्दांचे उच्चार शिकवले त्याला. त्यांचे नियम तयार केले. एकेकाळी मी धर्माच्या पोटी जन्म घेतला म्हणून मला धर्मज म्हणतात. मी नर आणि नारायण अवतार घेतले त्या काळी मी गंधमादन पर्वताच्या शिखरावर तपस्या करत असे. त्याकाळी दक्ष राजा मोठा यज्ञ करतो परंतु, महादेवाला त्याचा हिस्सा देत नाही. तेव्हां ऋषी दधीचीच्या सांगण्यामुळें रुद्र तो

यज्ञ नष्ट करतो. त्यावेळी रुद्राने फेकलेला एक बाण नर नारायणाच्या छातीला लागतो. त्यामुळे नारायणाचे केस हिरवे होतात. म्हणून मला मुंजकेषी म्हणतात. त्यानंतर तो बाण त्याची शक्ती नष्ट झाल्यावर शंकराच्या हाती जातो. त्यामुळे शंकर क्रुद्ध होतो व नरनारायणाच्या अंगावर धावून जातो. रागावलेल्या रुद्राला शांत करण्यासाठी नरनारायण त्याची गर्दन पकडतात. त्याचा रंग निळा होतो म्हणून त्याला सितीकांत म्हणतात. शंकाराला शिक्षा करण्यासाठी नारायण एक गवताचे पाते मंत्रून त्याच्यावर फेकतो त्या पात्याचे कुर्हाडीत रुपांतर होते, परंतु, ते मध्येच तुटते म्हणून त्यावरून मला खंडपरशू नांव पडले आहे.

अर्जुन विचारतो, ते युद्ध भारी होते त्यात अखेरीस कोण जिंकले, जनार्दना"?

भगवान सांगतात, जसे रुद्र आणि नारायण युद्धात जुंपले, सगळे विश्व चिंतेत पडले. अग्नी देव रुसला होता. मंत्रदेवता नाराज झाल्या होत्या. वेदांचे गाणे बंद झाले. पृथ्वी थरकापत होती. सगळ्या तेजस्वी निस्तेज झाल्या होत्या. अध्यात्मिक शक्ती नष्ट होते कीं काय, अशी भिती वाटून ब्रह्मदेव त्याच्या जागेवरून खाली कोसळले. ब्रह्मदेव रागावलेल्या शंकराला हात जोडून विनंति करतात कीं, आता थांबा, हे आपल्या कार्यक्रमात नाही. सगळ्या देवता अचंबित होऊन पहात होत्या कीं कोण माघार घेतो. ब्रह्मदेव महादेवाला बोलतात तुम्ही ज्येष्ठ अहात तुम्ही समजून घ्यायला पाहिजे नारायण तुम्हाला कनिष्ठ आहेत. परंतु महादेव ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. ब्रह्मदेव सांगतात तुमचा नेम चुकला व विश्वाच्या भल्यासाठी तपस्या करण्यास बसलेल्या नरनारायणांना तुमचा बाण लागला तेव्हां तुम्हाला माघार घ्यावयाला पाहिजे नितिशास्त्राच्या नियमानुसार जे शास्त्र आपणच तयार केले आहे. विश्वाच्या कल्याणासाठी नर नारायण तपस्या करत आहेत त्यांना मोकळे करा. ते समजल्यावर शंकर त्यांची शस्त्र टाकून नारायणाला मिठी मारण्यासाठी पुढे होतात. त्यांच्यातील गैरसमज दूर होतो. नारायणसुद्धा गैरसमजातून दूर झालेले शांत होतात. सगळ्या देवता आनंद व्यक्त करतात. अग्नी पुन्हा तेजात येतो, वेदाचे मंत्रघोष पुन्हा सुरू होतात. सगळे ऋषी आनंद व्यक्त करतात. नर नारायण त्यांच्या तपस्येत बसतात.

मी तुला सांगितले पृथा काय झाले त्या द्वंद्वांत. कोणी जिंकले वा हरले नाही. मी तुला जास्त प्रचारात नसलेली माझी नांव सांगितली. मी अव्यक्त रुपात आणि विविध रुपात सृष्टीत फिरत असतो. मी रुद्र अथवा काळ आहे. माझ्याच क्रोधातून तो उत्पन्न होतो. तू त्या युद्धात जे मारले होतेस त्यांना मी आधीच मारले होते. तू जर तुझ्या रथावर बसलेल्या कपीला विचारलेस तर तो सांगेल कोण त्यांना मारत होते, कपी जो महादेवाचा अंश आहे आणि मी असे आम्ही दोघे त्या क्षत्रियाना मारत होतो. तू अरे पंडुपुत्रा, फक्त कारणमात्र होतास.

मोक्ष धर्म पर्व भाग एकशे सत्तरावा संपला.

# - शांती पर्व भाग नववा संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,